नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १५८ * * नागपूर * सोमवार, दिनांक ८ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## जिंदच्या तरुणाची गोळ्या घालून हत्या

■ वृत्तसंस्था, जिंद, दि. ७ :
हरियाणातील जिंद येथील एका २६ वर्षीय तरुणाची अमेरिकेत गोळ्या घालून हत्या करण्यात आली. एकमेव घटना अशी होती की, त्याने रस्त्याच्या कडेला लघवी करणाऱ्या एका अमेरिकन व्यक्तीला थांबवले. यामुळे संतापलेल्या त्या अमेरिकन व्यक्तीने त्याची पिस्तूल काढून त्याच्यावर गोळ्या झाडल्या. यामुळे रक्ताच्या थारोळ्यात तो तरुण जमिनीवर पडला. जवळच्या लोकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत कपिलचे वय २६ वर्ष असून तो जिंद जिल्ह्यातील बाराह कलान गावचा रहिवासी आहे.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## उपराष्ट्रपती पदाचे झेंगट

उद्या उपराष्ट्रपती पदाची निवडणूक आहे. जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणामुळे राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले होते. बहुधा त्यांना एखाद्या वैद्याकडून हेमगर्भाची मात्रा मिळाली असावी. त्यामुळे ते अदृश्य असले तरी त्यांच्या तब्येतीची दृश्यपणे तेवढी काळजी करण्यासारखे काहीच दिसत नाही. पण त्यांच्या राजीनाम्यानंतर सर्व राजकारणाचीच तब्येत बिघडलेली दिसते कारण काठावर असलेले बहुमत, चंद्राबाबू आणि त्यांच्या पुत्राची काकदृष्टी, चिराग पासवानांचा रोष यासारख्या अनेक अडथळ्यांपायी सत्तारूढ पक्षाच्या सध्या तरी नाकीनऊ आलेले दिसत आहेत. पक्षाध्यक्ष नड्डा यांची मेजवानी रद्द होणे, त्याबरोबरच पंतप्रधान यांनीही आपल्या ठरवलेल्या शाही पंगतीची रंगत न देणे यामुळे दिल्लीचे राजकीय वातावरण एखाद्या रहस्यपटाप्रमाणे झाले आहे. इंडिया आघाडीने तेलुगु उमेदवार दिल्याबरोबर आंध्र प्रदेशांमध्ये जे काही प्रेमाचे उमाळे दिसून येत आहेत, त्यामुळे धाकधूक नसेल असे समजण्याचे अजिबात कारण नाही. इकडे आपल्या पक्षातच काही खासदार नाराज असल्याच्या वातावरणात घुमू लागलेल्या आहेत. सत्तारूढ एनडीएला कोणे एकेकाळी भरभरून मदत करणारे आंध्र प्रदेशचे वायएसआर आणि ओरिसाचे नवीन पटनायक वगैरे सारख्यांची मदत मिळते की नाही याचीही धास्ती आहे. गेल्या दहा ते अकरा वर्षात ज्या वातावरणात जे जे करायचे होते ते केले. आता आपलेच खासदार आपल्याला फसवतात की काय, अशा शंका कुशंका दिल्लीच्या दरबारात रोज घुमत आहेत. आजच्या परिस्थितीत एनडीएकडे निवडून येण्यासाठी जे काही बहुमत आहे ते बऱ्यापैकी आहे हे दिसत असले तरी, दिसते तसे नसते म्हणून जग फसते अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणे आपण फसू नये म्हणून एनडीएला जबरदस्त तयारी करावी लागत आहे. ज्या खासदारांना गेल्या दहा अकरा वर्षात फारशी किंमत मिळत नव्हती आणि ज्या खासदारांमध्ये तोंडातून ब्र काढण्याची हिम्मतही नव्हती. त्यापैकी काही खासदार आपला मुकपणा सोडून आता बोलू लागलेले आहेत, अशा प्रकारे बोलणे आजपर्यंत कोणीही केलेले नव्हते. आता सोमवारची रात्र आणि मंगळवारचा दिवस यशस्वीपणे पार पडला रे पडला की बोलणाऱ्यांना दिवसा तारे दाखवू असे सर्वोच्च नेते म्हणजेच 'त्रिदेव' मनोमन समजत असावेत. कितीही नाही म्हटले तरी इंडिया आघाडीला विजय मिळेल मिळेलच असे इंडिया आघाडीलाही अजिबात वाटत नाही, पण आपल्या क्षमतेपेक्षा थोडी मोठी आघाडी घेतली तरी तो विजयाकडे जाणारा मार्ग आहे असे विरोधक विरोधकांना म्हणता येईल. आधी त्या थेरड्या ट्रम्पने मुळातच खुंटी मारून ठेवली आहे, तिकडे बिहारमध्ये पप्पू साहेबांनी पप्पूगिरी सोडून टप्पूगिरी सुरू केल्यामुळे ती एक वेगळीच चिंता लागून राहिलेली आहे. या चिंतेच्या गुंत्यासोबत पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीर सारख्या राज्यातील निसर्गाच्या अवकृपेचा फटका फारच मोठा आहे. इतरही अनेक लहान मोठ्या प्रश्नांनी आता डोके वर काढणे सुरू केलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उद्या होणारे मतदान आपल्या पारड्यात कसे पडेल याचे गणित मांडण्याचे काम सुरू झालेले आहे. धनखडांचा राजीनामा एवढा महाग पडेल असे सत्तारूढ पक्षाला स्वप्नातही वाटले नव्हते. आपण त्या धनखडाला खड्यासारखे काढले मात्र, आता आपला खडा निशाण्यावर लागेल की नाही अशी सध्याची परिस्थिती आहे. कधीकाळी हे दिवस येतील अशी कल्पनाही कोणी केली नव्हती पण ती वेळ आता आलेली आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एवढे मोठे झेंगट अशाप्रकारे आपल्या मागे लागेल, याची जागेपणी तर सोडाच, स्वप्नातही कुणीच कल्पना केली नव्हती. सध्या वाट्टेल ते करून निवडणूक जिंकलीच पाहिजे. यासाठी आपले सर्व पहेलवान कामाला लावून यश मिळवणे, हेच आता सत्ताधारी पक्षाचे एकमेव लक्ष्य असेल.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# ओबीसींना कोणताही धक्का नाही

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ७ :
पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असून त्यांनी मागत राहावे, आम्ही शक्य तेवढे देत राहू, असे आश्वासन देखील त्यांनी दिले आहे.



## देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे. आमचे सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केले ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठवाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका. समाजाने मागण्या केल्या तर आम्ही मागण्या पूर्ण करू. तुम्ही मागत राहा, आम्हाला शक्य आहे तेवढे देत जातो, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे. क्रांतिकारी उमाजी नाईक यांच्याविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, उमाजी नाईक यांना मानाचा मुजरा करतो. दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या रामोशी समाजाचा संबंध हा प्रत्यक्ष श्रीराम याच्याशी आहे. रामोशी समाजाच्या राजाचे कार्य अतुलनीय आहे. शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यामध्ये बहिर्जी नाईक रामोशी हे महाराजांचे विश्वासू होते, गुप्तहेर होते. बहिर्जी नाईक हे तिसरा डोळा म्हणून काम करत होते.

देव देश धर्माच्या लढ्यात हा रामोशी समाज अग्रेसर होता. ब्रिटिशांना पहिला विरोध राजे उमाजी नाईक यांनी केला. त्यांनी सेना तयार करून इंग्रजांना पळवले. रॉबर्ट यांनी पत्र लिहिले का उमाजी नाईक शिवाजी महाराज झाले असते. उमाजी नाईक हे उत्तम प्रशासक होते, स्वतःच्या हाताने त्यांनी पत्र लिहिले आहेत.

## भारंगी नदीत विसर्जनावेळी पाच तरुण बुडाले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :
मुंबईजवळच्या शहापूरमध्ये गणेश विसर्जन सोहळ्याला गालबोट लागले आहे. गणेश विसर्जनाच्या वेळी शहापूर येथील भारंगी नदीत एक दुर्दैवी घटना घडली आहे. आरती सुरू असताना, पाच तरुण पाण्यात बुडाले. या घटनेत एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर दोघांचा शोध सुरू आहे.

काल सायंकाळी आसनगाव येथील मुंडेवाडीतील शिवतेज मित्र मंडळाच्या गणपती विसर्जनाची तयारी सुरू असताना, संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. मंडळातील दत्ता लोटे नावाचा तरुण पोहण्यासाठी नदीत उतरला, पण पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी त्याचे मित्र प्रतीक मुंडे, रामनाथ घारे, भगवान वाघ आणि कुलदीप जाखेरे यांनीही पाण्यात उडी मारली. यावेळी योगेश्वर नाडेकर या मित्राने प्रसंगावधान राखत रामनाथ घारे आणि भगवान वाघ या दोघांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर जीवरक्षक पथक आणि इतर मित्रांनी शोध घेतल्यानंतर प्रतीक मुंडेला पाण्याबाहेर काढले. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दरम्यान, अद्यापही दत्ता लोटे आणि कुलदीप जाखेरे यांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस प्रशासन, जीवरक्षक टीम आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

## पावगड शक्तीपीठमध्ये मालवाहू रोपवे तुटला

### ६ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था,
अहमदाबाद, दि. ७ :
गुजरातमधील पंचमहल जिल्ह्यातील पावगड येथील महाकाली मंदिर शक्तीपीठ येथे मालवाहू रोपवे तुटल्याने शनिवारी ६ जणांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. बचावकार्य सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोपवेची वायर तुटल्याने ट्रॉली उंचावरून जमिनीवर पडली. या अपघातात अनेक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

मृतांमध्ये २ लिफ्ट ऑपरेटर, २ कामगार आणि इतर दोघांचा समावेश आहे. मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. गुजरातमधील पंचमहल जिल्ह्यातील पावगड येथील महाकाली मंदिर शक्तीपीठ येथे शनिवारी मालवाहू रोपवे तुटल्याने सहा जणांचा मृत्यू झाला.

गुजरातमधील पंचमहल जिल्ह्यातील पावगड येथील महाकाली मंदिर शक्तीपीठ येथे शनिवारी मालवाहू रोपवे तुटल्याने सहा जणांचा मृत्यू झाला. रोपवेच्या तार तुटल्यामुळे हा अपघात झाला आणि ट्रॉली उंचावरून जमिनीवर पडली. रोपवेच्या तार तुटल्यामुळे हा अपघात झाला आणि ट्रॉली उंचावरून जमिनीवर पडली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. बचावकार्य सुरू आहे.

## पंतप्रधान मोदी पूरग्रस्त भागांना भेट देणार

■ वृत्तसंस्था, पंजाब, दि. ७ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच पंजाबमधील पूरग्रस्त भागांना भेट देऊ शकतात. हे ९ सप्टेंबर रोजी होऊ शकते. ज्यामध्ये मोदी पंजाबशिवाय हिमाचल आणि उत्तराखंडला भेट देऊ शकतात. पंजाबमध्ये ते गुरुदासपूरला जाऊ शकतात. यापूर्वी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज चौहान यांनी पंजाबला भेट दिली होती. त्यांनी सांगितले होते की, ते पंतप्रधान मोदींच्या विनंतीवरून पंजाबला आले आहेत. त्यांनी पंजाबला पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले होते. पंजाब सरकार केंद्राकडून सतत ६० हजार कोटी रुपयांच्या निधीची मागणी करत आहे.

राज्याचे अर्थमंत्री हरपाल चीमा यांच्या मते, राज्यातील २ हजार गावे पुरामुळे बाधित झाली आहेत आणि ४३ लोकांचा मृत्यू झाला आहे. केंद्र सरकारकडून मागितलेली मदत राज्याला अद्याप मिळालेली नाही. तथापि, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज पंजाबला ५ कोटी रुपये देण्याची घोषणा केली आहे.

## चाकण परिसरात चार युवक पाण्यात बुडाले

**पुणे :** पिंपरी -चिंचवडमध्ये गणपती विसर्जनला गालबोट लागल्याची घटना घडली. लाडक्या गणरायाला निरोप देत असताना वाकी बुद्रुक, शेलपिंपळगाव व बिरदवडी येथील वेगवेगळ्या घटनांमध्ये चार युवक पाण्यात बुडाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला असून, उर्वरित दोन युवकांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## उत्तराखंड- नौगावमध्ये ढगफुटी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील नौगाव येथे शनिवारी संध्याकाळी ढगफुटी झाली. त्यामुळे पाणी आणि ढिगारा बाजारात आणि डझनभर घरांमध्ये शिरला. रस्त्यावर पार्क केलेली अनेक वाहनेही वाहून गेली. तथापि, अद्याप कोणत्याही जीवितहानीबद्दल वृत्त नाही. जिल्हा प्रशासन, एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या टीम घटनास्थळी पोहोचल्या आहेत आणि बचावकार्य सुरू आहे.

## जहाल माओवाद्यास अटक



■ महासागर प्रतिनिधी,
गडचिरोली, दि. ७ :
खून, चकमक, जाळपोळ अशा गंभीर गुन्ह्यांत आरोपी असलेल्या जहाल नक्षलवाद्याला गडचिरोली पोलिसांच्या विशेष पथकाने तेलंगणातील हैदराबाद शहरातून अटक केली. शंकर ऊर्फ अरुण येर्रा मिच्चा (२५ रा. बांदेपारा, ता. भोपालपट्टनम, जि. बीजापूर, छत्तीसगड) असे अटक करण्यात आलेल्या जहाल नक्षलवाद्याचे नाव असून तो भूमिगत होण्यापूर्वी पेरमीली दलमचा सक्रिय सदस्य होता. त्याच्यावर दोन लाखांचे बक्षीस होते.

छत्तीसगडचा रहिवासी असलेला शंकर उर्फ अरुण २०१८ साली मद्देड दलममध्ये भरती झाला होता. २०२२ नंतर तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय झाला. २०२४ पर्यंत तो पेरमीली दलमध्ये कार्यरत होता. २०२३ रोजी कापेवंचा येथे रामजी आत्राम यांची त्याने हत्या केली.

दरम्यानच्या काळात गडचिरोली पोलिसांनी नक्षलविरोधी मोहीम अधिक तीव्र केल्याने घाबरलेल्या शंकरने भूमिगत राहून काही काळ शेती केली व त्यानंतर तो तेलंगणातील हैदराबाद येथे कामगार म्हणून राहू लागला. यासंदर्भात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात ह्यसी-६०ह्न पथकाच्या जवानांनी सापळा रचून ४ सप्टेंबरला हैदराबाद येथून शंकरला ताब्यात घेतले. यावेळी चौकशीदरम्यान त्याने हत्येची कबुली दिली. यावरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करीत त्याला न्यायालयात हजर केले.

## मुंबई उडवून देण्याची धमकी देणाऱ्याला नोएडा येथून अटक

■ वृत्तसंस्था, नोएडा, दि. ७ :
मुंबईत गणेशोत्सवादरम्यान स्फोट घडवून आणण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला शनिवारी उत्तर प्रदेशातील नोएडा येथून अटक करण्यात आली. ५० वर्षीय आरोपीचे नाव अश्विन कुमार सुप्रा आहे. तो बिहारमधील पाटणा येथील रहिवासी आहे आणि गेल्या ५ वर्षांपासून नोएडामध्ये राहत होता आणि ज्योतिष आणि वास्तुशास्त्राचा अभ्यास करत होता.

आरोपीने गुरुवारी रात्री उशिरा व्हॉट्सॲपवर मुंबई पोलिसांना धमकीचा संदेश पाठवला होता. त्याने लिहिले होते की, 'लष्कर-ए-जिहादीचे १४ दहशतवादी मुंबईत घुसले आहेत. दहशतवाद्यांनी ३४ वाहनांमध्ये ४०

० किलो आरडीएक्स बसवले आहे. ते एक मोठा स्फोट करणार आहेत, ज्यामध्ये एक कोटी लोकांचा मृत्यू होऊ शकतो.' धमकी मिळताच, मुंबई पोलिसांनी हाय अलर्ट जाहीर केला आणि तपास गुन्हे शाखेकडे सोपवला.

# विधवा आणि पीडित गांधारींच्या अति पुत्रप्रेमाचा परिपाक म्हणजे महाभारत

## वक्ता शतशहस्त्रेशू डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे तर्कशुद्ध गांधारीपुराण



**नागपूर, ७ सप्टेंबर :** आताचे अफगाणिस्तान महाभारत कालीन गांधारची राजकन्या सुबलपुत्री गांधारीचा विवाह तिच्या इच्छेविरुद्ध अंध धृतराष्ट्राबरोबर करणे गांधारीला मान्य नव्हते. पण तत्कालीन सर्वाधिक बलवंत हस्तीनापुरच्या मागणीला नकार देणे शक्य नव्हते म्हणून गांधारीने मूकपणे विवाहाचा स्वीकार केला. असे प्रतिपादन शब्दप्रभू डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी गांधारीचे चरित्र चित्रण करताना आज सुबुद्ध श्रोत्यांच्या उपस्थितीत अनेकदा टाळ्यांच्या कडकडाटात केले.

विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा आयोजित महाभारत कालीन गांधारी या व्याख्यानाचे अध्यक्ष डॉ. गिरीष गांधी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जस्टीस विजय डागा उपस्थित होते.

गांधारी ही कंधारच्या राजघराण्याची अत्यंत सुंदर, रुपवती, गुणवती, राजनीति निपुण कन्या होती. रामायणात जे स्थान कैकयीचे होते तेच स्थान कुरुवंशात गांधारीचे होते. गांधारीचे भविष्य वर्तवितांना असे सांगण्यात आली की गांधारीचा पहिला पती अल्पवयीन राहील. हे माहित असल्यामुळे आपल्या सर्वगुणसंपन्न कन्येला वैधव्य येवू नये म्हणून सुबल राजानी तिचा विवाह एका बोकडासोबत केला आणि त्यानंतर त्याचा बळी दिला. मग गांधारी विधवा झाली आणि या विधवा राजकन्येला बलाढ्य राजघराण्याचे कर्ते भीष्म पितामहांनी मागणी घातली. ती मान्य करुन तिचा विवाह धृतराष्ट्राबरोबर झाला. त्यावेळी कंधारला संपूर्ण संरक्षण देण्याचे आश्वासन भीष्मानी दिले होते. पण जेव्हा भीष्माला गांधारी विधवा होती हे कळले तेव्हा भीष्माने कंधारचा राजा राणी, भाऊ आणि बहीण यांना हस्तीनापुरच्या तुरुंगात बंदी केले. या चौघांना दररोज केवळ एक मूठ भात देण्यात येत होता. चौघांपैकी हा भात केवळ एक जण खात होता आणि त्यामुळेच तो जिवंत राहीला त्यांचे नाव शकुनी होते.

गांधारीने आपल्यावर केलेल्या सक्तीचे परिमार्जन म्हणून आपल्या अंध नवऱ्याप्रमाणे आपल्या डोळ्यावर रेशमी पट्टी बांधली होती. केवळ तेवढेच कारण नव्हते, तिला भीष्माचा चेहराही बघायचा नव्हता ही खरी गोम आहे.

गांधारीने ९९ पुत्र आणि एका पुत्रीला जन्म दिला त्याचीही हकीकत विचित्र आहे. गांधारीचा गर्भ दोन वर्षे तिच्या पोटातच होता. शेवटी तिनेच आपल्या पोटावर आघात करुन गर्भ बाहे काढला तेव्हा तो एक गोळा होता. त्यानंतर त्या गोळ्यातून शंभर मडक्यांच्या माध्यमाने शंभर जीव जन्मले. धृतराष्ट्राने आपल्या दासीबरोबर संभोग करुन एक पुत्र जन्माला घातला त्याचे नाव युयुत्सू. हा युयुत्सू महाभारताच्या युद्धात धृतराष्ट्राने आवाहन केल्यावर पांडवाच्या बाजूने आला.

गांधारीच्या पीढेचा अंत नाही. आयुष्यभर तिला अशाच वेदना भोगाव्या लागल्या. पहिला पुत्र दुर्योधन याचा जन्म झाल्यावर अनेक अपशकुन झाले पण गांधारी किंवा धृतराष्ट्रानी त्याची दखल घेतली नव्हती. गांधारीचा भाऊ शकुनी सोडल्यास इतर तिघेही मृत झाले होते. शकुनीला गांधारच्या राजगादीवर बसवण्याचे भीष्माच्या मनात होते. परंतू साम्राज्ञी गांधारीने आपल्या भावाला जावू दिले नाही. त्यानंतर शकुनी आणि गांधारी यांचा विक्शोभ आपल्याला बघायला मिळतो. विदुरने दुर्योधनाच्या बाबतीत वारंवार सांगूनही त्याचे म्हणणे कोणीच ऐकले नाही.

दुर्योधन पांडवांचा अतिशय तिरस्कार करीत होता. त्याने भीमाला विष पाजले पण सुदैवाने भीम पुन्हा परत आला. ही बाब गांधारीला ठाऊक होती पण ती मौन राहीली. लाक्षागृहात पांडवांना जाळण्यात येणार हे सुद्धा तीला ठाऊक होते. तेव्हाही ती गप्प राहिली. जी कुंती तिच्यावर जीव ओवाळीत होती आणि राज्याची खरी सम्राज्ञी होती तीही लाक्षागृहात भस्म होणार होती हे माहित असूनही गांधारीने त्याबाबत काही केले नाही. केवळ विदुराच्या सावधगिरीने पांडव वाचले.

हस्तीपुराचे विभाजन करताना पांडवांना खांडव वनातील पाच गांवे देण्यात आली होती. तेव्हाही गांधारी गप्प राहीली. पांडवांनी त्याचे इंद्रप्रस्थ स्थापन केल्यावर ईर्षेने धर्मराजाला जुगारासाठी पाचारण केले. त्यावेळी चौसरच्या ज्या सोगट्या होत्या त्या शकुनीच्या आज्ञेत होत्या. हे गांधारीला माहित होते तेव्हाही गांधारी गप्पच राहीली. सर्व राज्य व संपत्ती गमावल्यानंतर धर्मराजाने सर्व भाऊ व स्वत:ला पणावर लावले त्यातही तो हरला. त्यानंतर हरलेल्या धर्मराजाने द्रौपदीला पणाला लावले तेव्हीही पुत्रप्रेमी गांधारी काहीच बोलली नाही. त्यानंतर दुशासनाने द्रौपदीच्या वस्त्रांना हात लावला तेव्हाही गांधारीने प्रतिकार केला नाही. द्रौपदी एका सम्राटाची सम्राज्ञी होती याचे भानही गांधारीने ठेवले नाही.

महाभारत युद्धात जेव्हा पांडवाची सरशी होत होती तेव्हा गांधारीला निदान दुर्योधन तरी जिवंत राहावा म्हणून त्याने दुर्योधनला संपूर्ण कपडे काढून आपल्या समोर येण्याचा आदेश दिला. त्यावेळी आंघोळ करुन येणाऱ्या दुर्योधनाला श्रीकृष्णाने केवळ बालकालाच आपल्या मातेसमोर विवस्त्र जाणे धर्मात लिहीलेले आहे. हे पटविले आणि त्याने आपल्या शरीरातील गुप्तांग दिसू नये म्हणून त्यावर केळ्यांच्या पानाच आवरण घातले. गांधारीला डोळे उघडल्यावर ज्यांचा कडे पाहील त्यांचे अंग वज्राचे होईल असा वर होता. त्यामुळे पुत्रप्रेमापायी तिने पहिल्यांदा डोळ्यावरील आवरण काढले होते पण तिचा तो प्रयत्न कृष्णशिष्टाईमुळे असफल झाला. त्यानंतर भीमाने त्याच्या मांडीवर प्रहार करुन दुर्योधनला ठार मारले तेव्हा त्याचा क्षतविक्षत देह पाहण्यासाठी तिने दुसऱ्यांदा आपले आवरण काढले होते.

त्यानंतर गांधारीला सांत्वना देण्यासाठी श्रीकृष्ण जेव्हा तिच्याकडे गेले तेव्हा ती म्हणाली, कृष्णा तू मनात आणले असते तर हा संहार थांबला असता. कृष्णाने केवळ ५ गावांची मागणी केली होती तेव्हा पुत्रप्रेमी गांधारीने आपल्या लाडक्या दुर्योधनच्या कृष्णाला बंदी बणविण्याचाही विरोध केला नव्हता. कृष्णाने ३६ वर्षानंतर यदुकुळाचा नाश होईल हा दिलेला शाप स्विकारलाच.

गांधारीने आयुष्यभर केवळ दुर्योधनाकडेच पाहिले. हेच अभागी गांधारीच्या पुत्रमोहाचे फलित होते आणि त्यामुळेच कौरवांचा संपूर्ण नाश झाला.

डॉ. मिश्रा यांनी गांधारीच्या जीवनाचा संपूर्ण आलेख अत्यंत सुव्यवस्थीतपणे सादर केला त्यामुळे श्रोते दीड तास मंत्रमुग्ध होवून त्यांच्या वाणीप्रवाहात न्हाऊन निघाले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. गिरीष गांधी यांनी गांधारीच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा उल्लेख केला. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या अभ्यासपूर्ण आणि अपूर्व वाणीने गांधारीच्या गुणावगुणाच्या वर्णनाचे शब्दचित्र सादर करावे असे आवाहन केले.

आभार प्रदर्शन श्री बाळ कुळकर्णी यांनी केले तर सुयोग्य संचालन सुभदा फडणवीस यांनी केले.

# लालबागच्या राजाच्या विसर्जनाला विलंब

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :
गणेशभक्तांच्या अलोट उत्साहात मुंबईचा राजा, म्हणजेच लालबागचा राजा, विसर्जनासाठी गिरगाव चौपाटीवर दाखल झाला आहे. थोड्याच वेळात बाप्पाला निरोप दिला जाणार असून, या विसर्जन सोहळ्यासाठी चौपाटीवर गणेशभक्तांनी प्रचंड गर्दी केली आहे. यावर्षी लालबाग राजाच्या विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक तराफ्यावर मूर्ती चढवताना अडचणी आल्या. परिणामी, लालबागच्या राजाचे विसर्जन लांबले होते. आता मुर्तीला या गुजराती तराफ्यावर बसवण्यात यश आले आहे.

मंडळाचे सचिव सुधीर साळवी म्हणाले, मुंबईत पडत असलेला पाऊस आणि अरबी समुद्राची भौगौलिक परिस्थिती पाहता यावेळी



## समुद्राला भरती असल्याने विलंब

अरबी समुद्राला भरती लवकर आली. लालबागच्या राजाच्या गणपतीचं विसर्जन भरती आणि ओहोटीवर अवलंबून असते. आम्ही इथं पोहोचायच्या अगोदर भरती आली होती. आम्ही एक प्रयत्न करुन बघितला, लालबागचा राजा करोडो भाविकांचं श्रद्धास्थान आहे त्यामुळं तो प्रयत्न थांबवला

चिंचपोकळीच्या चिंतामणीचं विसर्जन झालं असून लालबागच्या राजाच्य विसर्जन अंतिम टप्प्यात आहे. काही तांत्रिक कारणांमुळे विसर्जनाला उशीर होत असल्याची माहिती आहे.

# फलकावरून दोन गटात तणाव

## सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. ७ :

धारूर तालुक्यातील एका गावात रविवारी दोन गटात वाद झाले. सोमवारी होणाऱ्या एका मेळाव्यावरून फलक लावणे व काढण्यावरून झालेल्या वादातून दोन्ही गट आमने-सामने आले. यावरून गावात तणावाची परिस्थिती असून, पोलीस दाखल झाल्यानंतर काहीसा तणाव निवळला असला तरी हे प्रकरण ठाण्यात पोहोचल्यानंतर सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गावात रविवारी एका गटाकडून मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्याच्या संदभार्ने गाववेशीवरील प्रवेशव्दार असलेल्या कमानीवर काही फलक लावण्यात आले होते.

या फलकावर देवतांसह संतझमहापुरुषांसह नेत्यांचेही छायाचित्र होते. मात्र हा फलक पाच ते सहा युवकांनी फाडल्याचा आरोप होत असून, त्यांचे कृत्य काहींनी पाहिल्याचा दावाही करण्यात आला आहे. तसेच, प्रवेशव्दारावर दुसऱ्या गटाकडून त्यांच्या नेत्याच्या स्वागताचा फलक लावताना दोन्ही गट आमने-सामने आले. या फलकावर दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए सारखी वाक्य लिहिण्यात आले होते. अशी वाक्यं विरोधी गटाला डिवचणारी आणि बोचणारी असल्याचा आरोप करण्यात आला व यातूनच उद्भवलेला वादाची माहिती पोलिसांना देण्यात आली. यानंतर या ठिकाणी पोलीस दाखल झाले व दुसऱ्या गटाकडून लावण्यात आलेला फलक काढल्याने तणावाचे वातावरण निवळले.

# देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वंचितांचे ओबीसींचे नेते नाही तर मराठ्यांचे पण नेते आहेत. त्यांनी ओबीसी विरोधी भूमिका घेतली नाही. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता त्यांनी आरक्षण दिले आहे, असे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी म्हटले आहे. तसेच देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते आहेत, राजकारणासाठी त्यांनी समाजाचा वापर केला नाही, त्यामुळे आरक्षणासाठी कोण बोलत असेल त्याकडे दुर्लक्ष करा, असे भोसले यांनी म्हटले आहे. क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सोहळ्यात बोलताना शिवेंद्रराजे भोसले यांनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राजे उमाजी नाईक यांची शासकीय जयंती व्हावी अशी मागणी होत होती. समाजाला दाबून ठेवण्याचे काम केले गेलं. समजून घेणारा नेता आला आणि जयंती आता साजरी होत आहे. देशात ज्यांनी अनेक वर्ष राज्य चालवले त्यांना जे जमले नाही ते मोदी यांनी केले. दिल्लीत शिवाजी महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांचे पुतळे मोदी पंतप्रधान झाल्यावर बांधले गेले.

# महाराष्ट्र हा कोणाच्या बापाची जहागिरी नाही : लक्ष्मण हाके



**सोलापूर :** राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाबाबतीतल्या मागण्या मान्य केल्यानंतर राज्यातील ओबीसी समाज दुखावला गेल्याचे बोलले जात आहे. तसेच मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवून दिली आहे. तर दुसरीकडे ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके हे सातत्याने पवार कुटुंबावर टीका करत आहेत. शरद पवारांनीच जरांगे नावाचे भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवले असल्याची टीका त्यांनी शुक्रवारी केली होती. आता पुन्हा एकदा त्यांनी अजित पवारांवर टीका केली आहे. महाराष्ट्र हा कोणाच्या बापाची जहागिरी नाही. हे राज्य अठरापगड जमाती आणि भटक्या-विमुक्तांचे आहे, हे दाखवून द्या, असे आवाहन लक्ष्मण हाके यांनी केले आहे. ते म्हणाले, सरकार 10 टक्के मराठा समाजाला घाबरत असेल तर आपल्याकडे 50 ते 60 टक्के समाज आहे. त्यामुळे ओबीसी समाजाचे शोषण पुरे झाले. इथले सरकार, आमदार आणि खासदारांना आपण पळता भुई थोडी करू.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकीय वापर करू नका : संजय राऊत



**मुंबई :** मराठा आरक्षणासोबत शिवाजी महाराज यांचा काहीही संबंध नाही. एक लक्षात घ्या. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत. तुम्ही त्यांच्या नावाने एक जातीय राजकारण करत छत्रपती शिवाजी महाराज यांना खाली आणत आहात. समुद्रात महाराजांचे स्मारक उभारणार होतात त्यांचे काय झाले? शिवरायांची विचारसरणी सगळ्यांना एकत्र घेऊन जायची आहे त्याला तुम्ही तिलांजली दिली आहे, आणि आपला राजकीय उदो उदो व्हावा म्हणून छत्रपतींच्या चरणी फुल वाहण्याचे चित्र आपण प्रसिद्ध करतात याची नोंद जनता घेत असते, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, हे राज्य मराठी माणसांचे राज्य आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी 18 पगड जाती जमाती आणि धर्म यांना हे स्वराज्य मिळवून दिले.

# होणाऱ्या नवऱ्यानेच अत्याचार करत केली तरुणीची हत्या

**पालघर :** लग्नापूर्वी शारीरिक संबंध ठेवण्यास नकार दिल्याने एका नराधमाने आपल्याच होणाऱ्या बायकोची निर्घृण हत्या केली आहे. या घटनेने बिबलधर गावात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पालघरमधील बिबलधर गावातील पीडित तरुणीचे आई-वडील शेतात कामासाठी गेले होते. ती घरात एकटीच असताना, तिचा होणारा नवरा तिथे आला. त्याने तिच्यावर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणला, मात्र तिने त्याला स्पष्टपणे नकार दिला. आरोपीने तिच्यावर बलात्कार केला आणि नंतर गळा दाबून तिची हत्या केली.

# पुण्यातील विसर्जन मिरवणूक १२ तासांनंतरही सुरूच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :



महाराष्ट्रात सर्वत्र लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. २७ ऑगस्ट रोजी घरोघरी आगमन झालेल्या गणरायाची १० दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' म्हणत गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप दिला. मात्र, पुढच्या वर्षी बाप्पा लवकर येणार नाहीत.

२०२६ मध्ये गणपती बाप्पाचे आगमन उशिरा होणार आहे. हिंदू दिनदर्शिकेनुसार, पुढील वर्षी १४ सप्टेंबर २०२६ रोजी बाप्पांचे आगमन होणार आहे आणि २५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्दशी असेल. याचा अर्थ, यंदाच्या तुलनेत पुढील वर्षी गणेशोत्सवासाठी भक्तांना तब्बल १८ दिवस अधिक वाट पाहावी लागेल.

मालेगावमध्ये प्रमुख गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकांवर नागरिकांनी फुलांची उधळण केली. ही मिरवणूक शहरातील शाहिद अब्दुल हमीद रोड आणि दयाना परिसरातून पोलिस बंदोबस्तात, तसेच राज्याचे मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत पार पडली.

लालबागच्या राजाची मिरवणूक मोठ्या उत्साहात सुरू असून, तो सध्या भायखळाच्या हिंदुस्थानी मशिदीसमोर पोहोचला आहे. या ठिकाणी पोहोचण्यास लालबागचा राजाला 11 तास लागले. यावेळी राजाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.

एका वृत्तवाहिनीचे पत्रकार विकास मिरगणे गणपती विसर्जनाचे कव्हरेज करत असतांना त्यांना एपीआय शांताराम नाईक यांनी पार्किंगच्या कारणावरून मारहाण केली आहे. याप्रमाणे मुंबई प्रेस क्लब, मुंबई मराठी पत्रकार संघ, विधीमंडळ वार्ताहर संघ, टिव्हीजेए असोसिएशनच्या वतीने निषेध करण्यात आला असून. यासंबंधीत गृहमंत्री (शहर) योगेश कदम यांच्याकडे तक्रार सुद्धा केली आहे. गृहमंत्री कदम यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत डीसीपी यांना सांगून संबंधित प्रकरणाची चौकशी करून संबंधित एपीआय नाईक यांच्यावर कारवाईचे आदेश दिले आहे.

मुंबईतील प्रसिद्ध जुहू बीचवर गणपती विसर्जन शांततेत सुरू आहे. मोठ्या गणेशमूर्ती समुद्रात विसर्जित केल्या जात आहेत, तर लहान मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन केले जात आहे. विसर्जन सोहळ्यादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संपूर्ण किनारपट्टीवर सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांची एक मोठी टीम मदतकार्य करत आहे. तसेच, संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी जीवरक्षकांचे पथक देखील तैनात करण्यात आले होते.

मालेगावमधील गणेश विसर्जन सोहळ्याला गालबोट लागले आहे. वर्गणीचे पैसे मागायला गेलेल्या एका व्यक्तीला मारहाण करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. यामुळे संगमेश्वर येथील परमात्मा गणेश मंडळाने विसर्जन मिरवणूक थांबवली होती. गणेशोत्सवाच्या दहाव्या दिवशी पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांची विसर्जन मिरवणूक पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात, लेझीम पथकांच्या तालावर आणि भक्तिमय वातावरणात सुरू झाली. सकाळी साडेनऊ वाजता सुरू झालेली ही मिरवणूक तब्बल 12 तासांचा टप्पा पार करून रात्रीही उत्साहात सुरूच आहे. पुण्यातील गणेशोत्सवाची शान मानला जाणारा दगडूशेठ हलवाई गणपतीचा विसर्जन सोहळा रात्री 9 वाजून 23 मिनिटांनी पार पडला. दगडूशेठ गणपतींच्या मिरवणुकीला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता आदी प्रमुख मार्गांवरून विविध सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका निघाल्या आहेत. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि ह्यगणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात पुणे शहर भक्तिभावात रंगून गेले आहे. पोलिसांकडून विसर्जन मिरवणुकीसाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# शेतकरी आत्महत्या सुरू असताना कोट्यवधींच्या जाहिराती का?

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ७ :



**देवाभाऊ कॅम्पेनवरून रोहित पवारांचा सवाल**

अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्याच्या विविध वृत्तपत्रांमध्ये 'देवाभाऊ' अशा शीर्षकाखाली मोठ्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर या जाहिराती दिल्या गेल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. आता यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. एकीकडे राज्यात शेतकरी आत्महत्या करत असताना आणि अतिवृष्टीने शेतीचे नुकसान झालेले असताना, वृत्तपत्रांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती का दिल्या गेल्या? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागल्याचे मानले जात आहे. सरकारने काढलेल्या अध्यादेशामुळे मराठा समाजाचे समाधान झाल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर अनंत चतुर्दशीच्या दिवशी राज्याच्या विविध वृत्तपत्रांमध्ये 'देवाभाऊ' अशा शीर्षकाखाली मोठ्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. या जाहिरातींमध्ये देवेंद्र फडणवीस यांचे मोठे छायाचित्र होते. विशेष म्हणजे या जाहिराती निनावी होत्या, म्हणजेच त्या कोणी दिल्या, याचा उल्लेख नव्हता. त्यामुळे राजकीय वतुर्ळात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. या जाहिराती कोणी दिल्या, याबाबत रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत मोठा खुलासा केला आहे. या जाहिराती भाजपच्या नव्हे, तर मित्रपक्षाच्या एका मंत्र्याने दिल्या असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

एकीकडे राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या होत असताना आणि अतिवृष्टीने संपूर्ण महाराष्ट्र झोडपला असताना वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर तसेच अनेक विमानतळांवर कोट्यवधी रुपये उधळून मुख्यमंत्र्यांच्या मोठमोठ्या जाहिराती देण्याची सरकारची वृत्ती बघून मोठी चीड आली, परंतु देवेंद्र फडणवीस साहेबांसारखे मोठे नेते अशी चूक करणार नाहीत, हा विश्वास होता या कोट्यावधी रुपयांच्या जाहिरातीबद्दल अधिक माहिती घेतली असता या जाहिराती देवेंद्र फडणवीस साहेबांना न कळवताच सरकारमधील एका मंत्र्याने परस्पर दिल्या असल्याचे समजले आणि विशेष म्हणजे हे मंत्री महोदय भाजपाचे नाहीत तर मित्रपक्षाचे आहेत असे देखील कळत आहे.

# कुर्डूमध्ये मुरूम माफियांची बीडपेक्षा मोठी दहशत : धैर्यशील मोहिते पाटील

■ महासागर प्रतिनिधी,
सोलापूर, दि. ७ :



सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुर्डू येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोनवरील वादग्रस्त व्हिडिओवर माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी जोरदार टीका केली आहे. मोहिते-पाटील यांनी कुर्डू गावात बीडपेक्षा भयानक दहशत असल्याचा आरोप केला, ज्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. या वादाची सुरुवात तेव्हा झाली, जेव्हा महिला आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांनी मुरूम उपशावर कारवाई सुरू केली होती. त्यावेळी एका राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याने थेट अजित पवार यांना फोन लावून अंजना कृष्णा यांना बोलण्यास दिले. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अजित पवार यांनी या महिला अधिकाऱ्याला धमकावल्याचा आरोप झाल्याने देशभरातून त्यांच्यावर टीका सुरू झाली आहे.

या प्रकरणावर बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, या गावात मुरूम माफियांची मोठ्या प्रमाणात दहशत असून सरकारी जागेतील व मुंबई पुण्याला जगायला गेलेल्या गोरगरीब आणि दलित शेतकऱ्यांच्या शेतातील कोट्यवधी रुपयाचा मुरूम या माफियांनी उचलला आहे. शासनाने वरिष्ठ पातळीवरून या संपूर्ण गावाची तपासणी केल्यावर हे भयानक वास्तव समोर येणार असून गावातील ग्रामस्थ किती दहशतीत आहेत हेही दिसेल, असे मोहिते पाटील यांनी म्हटले.

# प्रेमप्रकरणामुळे पित्याकडून मुलीचा खून

**जालना :** प्रेम प्रकरणाच्या कारणावरून पोटच्या मुलीचा गळा दाबून खून करून तिचे प्रेत गळ्यास दोरी बांधून लटकवून आत्महत्या असल्याचे भासवणाऱ्या पित्यास बदनापूर पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिस उपनिरीक्षक संतोष कुकलारे शुक्रवारी रात्रीच्या वेळी गस्तीवर असताना ही घटना समोर आली. शनिवारी दुपारी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. बदनापूर तालुक्यातील दावलवाडी गावात हरी बाबूराव जोगदंड यांच्या मुलीने आत्महत्या केली असल्याचे समजल्यानंतर पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. मात्र मुलीच्या आत्महत्येबद्दल पोलिसांना संशय आला. मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी बदनापूर ग्रामीण रुग्णालयात नेल्यानंतर मुलीचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाले.

# स्टेअरिंगचा रॉड तुटल्याने कल्याण आळेफाटा बसला मुरबाडजवळ अपघात

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ७ :

**सहा प्रवासी जखमी**

कल्याण बस आगाराच्या कल्याण आळेफाटा धावत्या बसच्या स्टेअरिंगचा रॉड रविवारी सकाळी मुरबाड सरळगाव रस्त्यावरील एका गाव हद्दीत अचानक तुटला. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटताच बस रस्त्याच्या बाजुला असलेल्या झुडपांमधून एका झाडाला जाऊन आदळली. बस सपाटीला असताना हा अपघात झाल्याने मोठी हानी टळली. या अपघातात सहा प्रवासी किरकोळ जखमी झाल्याचे सांगण्यात येते. चालकाने प्रसंगावधान राखल्याने त्यालाही किरकोळ दुखापत झाली. वाहकालाही मुका मार लागला आहे. दोन महिन्यापूर्वीच कल्याण बस आगाराच्या एका धावत्या बसचे पुढील चाक कल्याण मुरबाड रस्त्यावर गोवेली भागात अचानक निखळून बस रस्त्याला घासत जाऊन पुढे थांबली होती. यामध्ये काही प्रवासी किरकोळ जखमी झाले होते. ही घटना ताजी असतानाच सोमवारी माळशेज घाटमार्गे जाणाऱ्या कल्याण आळेफाटा बसच्या स्टेअरिंगचा रॉड तुटल्याने अपघात झाला. ही घटना माळशेज घाट मार्गात झाली असती तर किती मोठी दुर्घटना घडली असती अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

# पतीकडून पत्नीचा निर्घृण खून

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

भिवंडी शहरातील ईदगाह झोपडपट्टी जवळील खाडी परिसरात एका अज्ञात महिलेचे धडावेगळे शीर आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेत भोईवाडा पोलिसांनी अवघ्या 48 तासांत मृत महिलेच्या पतीला अटक केली असून, हत्या केल्यानंतर शरीराचे तुकडे करून खाडीत टाकल्याची कबुली आरोपीने दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेची ओळख परवीन उर्फ मुस्कान (वय 26, रा. भिवंडी) अशी झाली असून, आरोपी पतीचे नाव मोहम्मद तहा इम्तियाज अन्सारी (वय 30) आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांचा दोन वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला होता. त्यांना एक वर्षाचा मुलगा आहे. पोलिसांनी स्थानिक नागरिकांकडून माहिती घेतली तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशनच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. आरोपी पतीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान, पोलिसांनी आरोपीला भिवंडी न्यायालयात हजर केले असता त्याला 11 सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. मुस्कान ही सोशल मीडियावर, विशेषतः इन्स्टाग्रामवर रील तयार करत होती. तिच्या ऑनलाईन सक्रियतेवरून पती मोहम्मद तहा याला संशय होता. काही दिवसांपूर्वी याच कारणावरून पुन्हा एकदा त्यांच्यात वाद झाला.

# संजय राऊत यांची वैचारिक सुंता झाली : नवनाथ बन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ७ :



औरंगजेब फॅन क्लबचे प्रवक्ते आणि ज्यांची वैचारिक सुंता झाली आहे, अशा संजय राऊत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊ नये. रा.स्व. संघ हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारावर चालत आहे. संघाच्या प्रत्येक कार्यक्रमाची सुरुवात ही शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करत केली जाते. डॉ. हेडगेवार यांनी सांगितले होते की व्यक्ती म्हणून आदर्श मानायचे असेल तर केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांना माना, असे भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.

नवनाथ बन पुढे बोलताना म्हणाले की, त्यामुळे संजय राऊत यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेण्याचा अधिकार आणि संघाला सल्ला देण्याचा अधिकार नाही. राऊत हे नक्षली विचारांचे आहेत. देवा भाऊ महाराजांच्या विचारावर राज्य कारभार करतात. तुम्ही राज्य कारभार खंडणी खोरीवर चालवतात हे जनतेने पाहिले हे तुमचे शिवरायांवर बेगडी प्रेम आहे हे जनतेने ओळखले आणि विधानसभा निवडणुकीत तुम्हाला घरी बसवले.

# अज्ञात वाहनाने चिरडल्याने बालिकेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

मुंबई- लालबागचा राजा मंडळाच्या प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर झोपलेल्या दोन लहान मुलींना भरधाव वेगात धावणाऱ्या ट्रकने धडक दिली. या अपघातात २ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला, तर ११ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला. शनिवारी पहाटे गजबजलेल्या ठिकाणी हा अपघात घडला. सीसीटीव्हीच्या आधारे काळाचौकी पोलीस फरार चालकाचा शोध घेत आहेत.

परळ येथील लालबाग राजा प्रसिध्द गणपती आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे या परिसरात मोठी गर्दी असते. शनिवारी मुंबईत विघ्नहर्त्याला निरोप देण्याची लगबग सुरू होती. गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते. त्यावेळी लालबागच राजाच्या मुख्य प्रवेशद्वासमोरील रस्त्यावर भीषण अपघात झाला.

याबाबत माहिती देताना काळाचौकी पोलिसांनी सांगितले की, लालबाग राजाच्या दर्शनासाठी जाण्यासाठी विविध प्रवेशद्वार आहेत. मुख्य प्रवेशद्वाराजवळील रस्त्यावर शुक्रवारी रात्री एक कुटुंब झोपले होते. शनिवारी पहाटे ४ च्या सुमारास एक अज्ञात वाहनाने झोपलेल्या दोन लहान मुलांना जोरदार धडक दिली. त्यात चंद्रा मुजुमदार या २ वर्षांची लहान मुलगी आणि तिचा ११ वर्षांचा भाऊ शैलू मुझुमदार जखमी झाला. स्थानिकांनी दोघांना उपचारासाठी केईएम रुग्णालयात दाखल केले. परंतु गंभीर जखमी असलेल्या चंद्राचा मृत्यू झाला. शैलू गंभीर जखमी असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाला. शनिवारी गणेशोत्सवाचा शेवटचा दिवस होता. लालबागच्या राजाला पाहण्यासाठी हजारोंची गर्दी जमली होती.

# ब्रिजस्टोन इंडिया गणेश चतुर्थी व्हिडिओत राजन पाटकर यांच्या कलेची दखल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :



गणेश चतुर्थीच्या निमित्ताने ब्रिजस्टोन इंडियाने अलीकडेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक व्हिडिओ जारी केला आहे. या व्हिडिओमध्ये प्रसिद्ध मूर्तिकार राजन पाटकर यांचे मूर्तिकाम आणि कलाकृतीची दखल घेण्यात आली. याच कलाकाराने प्रसिद्ध गिरगावचा राजाची शाश्वत मूर्ती तयार केली आहे. गिरगावचा राजा हा मुंबईतील सर्वात जुन्या सार्वजनिक गणेश मंडळांपैकी एक असून 1928 पासून त्याची स्थापना करण्यात येते.

ब्रिजस्टोन सुमारे 29 वर्षांपासून भारतात अस्तित्वात असून देशातील लोक, संस्कृती आणि मोठ्या प्रमाणात समाजाशी पूर्णपणे जोडलेली आहे. ब्रिजस्टोन ए8 कमिटमेंटमध्ये, भावनांचे मूल्य उत्साह निर्माण करण्याच्या आणि गतिशीलतेच्या जगात आनंद पसरवण्याच्या वचनबद्धतेबद्दल आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून कंपनी देशातील उत्सवाचा उत्साह साजरा करण्यासाठी आपल्या ग्राहकांच्या भावनांशी जोडली जाते.

गणेश चतुर्थी उत्सवादरम्यान लाडक्या गणपती बाप्पाची मूर्ती घडविण्यात शिल्पकाराने वर्षानुवर्षे आदर आणि कलात्मकतेचे दर्शन घडवले आहे. ब्रिजस्टोन ग्राहकांच्या अनुभवात भर घालण्याच्या उद्देशाने आपल्या उत्पादन प्रस्तावांत सतत संशोधन आणि विकास तसेच नाविन्यपूर्णतेसाठी वचनबद्ध आहे.

एजन्सीच्या संकल्पनेवर आधारित असलेल्या व्हिडिओत कंपनीच्या मूल्यांशी सुसंगत असलेल्या कथानकाची रचना करण्यासाठी आणि ब्रिजस्टोन समूहाचे ध्येय समोर आणण्यासाठी सादरीकरणाचा विचार करण्यासाठी माहिती देण्यात आली. या महितीत कंपनीच्या संस्थापकांचा विचार 'उच्च गुणवत्तेसह समाजाची सेवा करणे प्रादेशिक प्रासंगिकतेसह प्रभावी आणि भावनिक कथा सांगून मांडण्यात आला. हा सण साजरा करणाऱ्या लोकांच्या आस्थेची दृश्ये आणि पाटकर यांची कलाकृती व्हिडिओतून प्रेक्षकांसमोर उलगडतात. ज्यामधून ब्रिजस्टोनची भारतात रुजलेली खोल मुळे, त्याची संस्कृती आणि भारतीय ग्राहकांशी असलेला संबंध तसेच त्यांच्या गरजा अधोरेखित होतात. हा व्हीडिओ म्हणजे एका सद्गुणी मान्यवराने दुसऱ्या दिग्गजाला केलेला सलाम आहे.

# महाराष्ट्राला हवामान विभागाचा पुन्हा अलर्ट : पावसाची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, देशभरातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विशेषतः गुजरात आणि राजस्थानमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस होण्याची शक्यता असून, काही भागांत अत्यंत मुसळधार पावसाचा धोका आहे. या दोन राज्यांसाठी हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची भीती असून, शहरी भागात पाणी साचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले गेले आहेत. महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, कोंकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि ठाणे या जिल्ह्यांना यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यासोबतच नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भात नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना बळ मिळेल, मात्र अतिवृष्टी झाल्यास शेतीसह जनजीवनावर परिणाम होऊ शकतो.

अरुणाचल प्रदेश, असम, मेघालय, नागालंड, मणिपूर, मिजोरम आणि त्रिपुरा या ईशान्येकडील राज्यांमध्येही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या भागांमध्ये भूस्खलनाचा धोका वाढू शकतो. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये जोरदार पावसाची शक्यता असल्यामुळे डोंगराळ भागात दरडी कोसळण्याचा आणि पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका हवामान खात्याने वर्तविला आहे. याशिवाय उप-हिमालयी पश्चिम बंगाल आणि सिक्किममध्येही जोरदार पावसाचा अंदाज असून, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.





▪दोन वर्षांच्या अधिराज अक्षय खाडे या बालकानेही आपल्या जीप गाडीत गणपती बाप्पांना बसवून त्यांना निरोप दिला.

गणपती बाप्पा मोरया,पुढल्या वर्षी लवकर या...

# जड अंतकरणाने अकोलेकरांनी दिला बाप्पाला निरोप

■ अकोल्यात १३२ वर्षांची विसर्जन मिरवणूक परंपरा जोमात ■ढोल-ताशांच्या निनादात बाप्पाला भावपूर्ण निरोप
■ विसर्जन मिरवणुकीत ६२ मंडळांचा सहभाग■रंगीबेरंगी रांगोळ्या■भटींडा पंजाबच्या ढोल ताशे प्रात्यक्षिकांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले
■ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ■पोलीस, महापालिका प्रशासनाची चोख तयारी ■ गणेश भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
■ गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी अकोलेकरांनी विसर्जन मिरवणुकीत केली गर्दी







▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

**अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने अकोल्यात शनिवारी पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीत हजारो गणेश भक्तांनी गर्दी करत बाप्पाला साश्रूनयनाने निरोप दिला. १३२ वर्षांची सांस्कृतिक परंपरा जोपासणारी ही विसर्जन मिरवणूक शनिवार सकाळी जयहिंद चौक येथून प्रारंभ झाली. ढोल-ताशांच्या निनादात, विविध आखाड्यांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांमध्ये आणि वाद्यांच्या गजरात बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. सार्वजनिक गणेशोत्सवांसह घरोघरी विराजमान विघ्नहर्ता गणपती बाप्पाला शनिवारी अनंत चतुर्दशीला वाजत-गाजत भावपूर्ण निरोप देण्यात आला. अकोल्यातील पारंपरिक विसर्जन मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. या मिरवणुकीत ६२ गणेशोत्सव मंडळांसह आखाड्यांनी सहभाग घेतला. गणेश विसर्जनासाठी गणेशभक्तांसह महापालिका, महसूल व पोलीस प्रशासनाने चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.**

शतकोत्तर १३२ वर्षाची परंपरा आजही अबाधित ठेवली आहे. विसर्जन मिरवणुकीसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. गणेश विसर्जन मिरवणुकीला शनिवारी सकाळी ११ वाजता जयहिंद चौक येथून प्रारंभ झाला. ह्या मिरवणुकीत यावेळी मानाच्या श्री बाराभाई गणपती मंडळाचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी गुलाबराव गावंडे (मा. राज्यमंत्री)

आ. ॲड. ना. आकाश फुंडकर (जिल्हा पालकमंत्री) , खा. अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर, आमदार साजिदखान पठाण आ. अमोल मिटकरी, डॉ. रणजीत पाटील (माजी मंत्री), माजी आ. गोपीकिशन बाजोरिया, विप्लव बाजोरिया, राजेश मिश्रा, मदन भरगड, विजय अग्रवाल (माजी महापौर) रामप्रसाद मिश्रा, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक श्री रेड्डी साहेब शंकरराव शेळके एलसीबी जुने शहर ठाणेदार लेवरकर यांनी पूजन केले. श्री बाराभाई गणपती मंडळातर्फे प्रसादाचे वितरण करण्यात आले. श्री बाराभाई गणपतीच्या पाठोपाठ मिरवणुकीमध्ये मानाचे राजेश्वर गणपती, जागेश्वर गणपती व खोलेश्वर गणपती सहभागी होते. त्यानंतर आलेले गणेशोत्सव मंडळ मिरवणुकीत सहभागी झाले. असंख्य गणेश मंडळ मिरवणुकीत सहभागी झाले आहेत. जयहिंद चौकातून निघालेली मिरवणूक अगरवेस भागात बाराभाई गणपतीचे अत्यंत भव्य आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. या निमित्ताने नागरिकांनी एकत्र येत तब्बल १०० मीटर लांब रंगीबेरंगी रांगोळी तयार केली. या भव्य रांगोळीने बाराभाई गणपतीचे स्वागत करत एक आगळीवेगळी सांस्कृतिक एकता आणि भक्तिभाव प्रकट केला. अगरवेश परिसरात नागरिकांनी सजावट, फुलांचे तोरण व पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणपती बाप्पाचे स्वागत केले. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण या कार्यक्रमात सहभागी झाले होते. ही रांगोळी बघण्यासाठी परिसरातील आणि बाहेरील नागरिकांचीही गर्दी उसळली होती. या सोहळ्यामुळे संपूर्ण अगरवेश गणपतीमय झाला होता नंतर दगडी पूल, मामा बेकरी,



उदय टॉकीज, मानेक टॉकीज, अशोक स्टँड, सुभाष चौक, तेलीपुरा चौक, ताजनापेठ पोलीस चौकी, किराणा बाजार, सराफा बाजार, जैन मंदिर, गांधी चौक, गांधी रोड, शहर कोतवाली मार्गे विसर्जन मिरवणूक गणेश घाटावर पोहोचली. यावर्षी मिरवणुकीत अनेक गणेश मंडळे व आखाड्यांचा सहभाग घेतला आहे. चित्तधरारक प्रात्याक्षिके; ठिकठिकाणी स्वागतविविध आखाड्यांनी चित्तधरारक प्रात्याक्षिके सादर करून लक्ष वेधून घेतले.

# निरोप घेतो देवा आम्हा आज्ञा असावी चुकले आमुचे काही त्याची क्षमा असावी!

अत्यंत थाटात भाजपा पक्ष कार्यालय येथे स्थापना करण्यात आलेल्या बाप्पांचा 'भाजपाचा राजा' अत्यंत उत्साहात व भक्तिभावात या १० दिवसात गणरायाची पूजा व अर्चना करत बाप्पांना आज निरोप देण्यात आला यावेळी घडलेली सेवा चरणाशी घेऊन जनतेच्या कल्याणाची व कृपाभिलाषाची गणेशाला कामना केली. यावेळी वाजत गाजत बाप्पांची मिरवणूक काढण्यात आली, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून जल्लोष साजरा करत गणरायाला गणेश घाट येथे विसर्जित करण्यात आले. यावेळी आमदार श्री. रणधीर भाऊ सावरकर, खासदार श्री. अनुप भाऊ धोत्रे, विजय भाऊ अग्रवाल, ग्राम ीण जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ शिवरकर, किशोर मांगटे पाटील, महानगर संघटन सरचिटणीस संजय गोटफफोडे, ग्रामीण संघटक सरचिटणीस माधव मानकर, महानगर सरचिटणीस ॲड देवाशीष काकड, रमेश अल्करी, पवन भाऊ महल्ले, गणेश लोड, जितू देशमुख, गिरीश जोशी, सिद्धार्थ शर्मा, संजय जोशी सोबतच सर्व जिल्हा व महानगर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# अडगांव बु येथे गणपती बाप्पाची मिरवणूक शांतते पार पडली




तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु दि ६/९/२०२५ रोजी आडगाव गणपती विसर्जनाचे अडगाव गावातून मिरवनुक काढुन शांततेने पार पडञे तर गणपती विसर्जनासाठी आडगाव येथील त्याचे १५ मंडळ होते त्याच्यापैकी १४ मंडळ यांनी सहभाग घेतला होता मंडळाचे कार्यकर्ते यांनी खूप उत्सव आनंद आणि सरकारच्या नियमाला अनुसरुन सास्कृतीक कार्यक्रम राबविला वृक्षारोपन आरोग्य शिबिर या सारखे कार्यक्रमही सूद्धा दहा दिवसात राबविले तर मिरवनुकीत डी जे कम बॅड पथक टाळ मृदुग, ढोलाचे भजन असे गणपती ऊत्सवात मिरवनुक काढली यावर्षी डीजेला बंद असताना डीजेच्या वापर कोणीही करू नये असा आदेश जिल्हाधिकारी यांनी दिलेला होता त्याने मान ठेवून अडगांव बु मित्र मंडळांनी गणपती बाप्पाचा जल्लोशात पुढच्यावर्षि लवकर याचे घोषनादेत मिरवनुक पार पडली मिरवनुकीत ठिकठिकानी नाष्ता चहा पाणीची व्यवस्था गावर्कयाकडुन तसेच रावसाहेब गृप कडुन दिलीप डवले मित्र मंडळ ने केली होती गणपती मंडळाचे रथ मुख्य गांधी चौकातुन जमा होऊन अडगाव बाजारपुरा, तेलीपुरा, गजानन नगर, शिवाजीनगर, लाल मारुती चौक, असे सर्व गणपती मंडळानी गावातून संध्याकाळी पाच ते दहा वाजेपर्यंत मिरवणूक सुरू होती गणपती विसर्जन शांततेने पार पडण्यासाठी अकोट डऊझज नितीन पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरेखड पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड साहेब त्यांची टीम पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्टॉप, आर सी पी कमांडो, सह होमगार्ड, , पोलीस पाटील, महसूल विभाग कर्मचारी,तंटामुक्ती अध्यक्ष , ग्रामपंचायत सदस्य,पत्रकार मंडळी, प्रतिष्ठित नागरिक व गाव मंडळी उपस्थित होते



# मुर्तीजापुरात पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाची पर्वणी ६०४ गणरायांचे पवित्र कुंडात विसर्जन



कैलासचंद्र अग्रवाल, फादर जोसेफ, नेहा दीदी आदी मान्यवर



**मुर्तीजापूर :** वाढते ग्लोबल वॉर्मिंग, नद्या-तलावांचे जलप्रदूषण, विहिरींच्या पाण्याची घटती पातळीः या गंभीर संकटांना पर्याय म्हणून मुर्तीजापुर स्वच्छता अभियान व नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने गेल्या नऊ वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाची सुंदर परंपरा जोपासली जाते. यंदा नागरिकांनी अविस्मरणीय उत्स्फूर्तता दाखवत ६०४ घरगुती गणरायांचे विसर्जन पवित्र कुंडात मंगलमय वातावरणात पूर्ण भक्तिभावाने केले.छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारलेल्या पवित्र कुंडाचे पूजन गंगा, नर्मदा, गोदावरी, पूर्णा आणि काटेपूर्णा नद्यांमधून आणलेल्या पवित्र जलाने पं. धनंजय मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार हरीष पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, ठाणेदार अजित जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, सामाजिक कार्यकर्ते सतीश अग्रवाल, माजी नगराध्यक्षा मोनाली गावंडे, सामाजिक कार्यकर्त्या रुपाली तिडके, कमलाकर गावंडे, भारत जेठवाणी, द्वारकाप्रसाद दुबे, कैलास महाजन, रितेश सबाजकर, केतन तिडके, प्रा. अविनाश बेलाडकर, प्रा. दीपक जोशी, उपस्थित होते.या उपक्रमात शिंधु बँक व मुर्तीजापुर राज्य परिवहन महामंडळाच्या गणपतीचेही पवित्र जलकुंडात विसर्जन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी अपार यांनी स्वतःच्या घरगुती गणरायाचे विसर्जन करून इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण घातले.

मुर्तीजापुर स्वच्छता अभियान टीमचे जेष्ठ मार्गदर्शक माजी प्राचार्य सत्यनारायण तिवारी यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली अभियान टीमच्या सर्व सदस्यांच्या कठोर परिश्रमांमुळेच हा कार्यक्रम ऐतिहासिक यशस्वी ठरला.

महासागर ●सोमवार,दि.८ सप्टेंबर २०२५

अकोला पान ६

# काटेपूर्णा प्रकल्पाचे आठ दरवाजे उघडले!

**अकोला :** काटेपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये सतत पावसामुळे धरणातील पाण्याची पातळी धोक्याच्या टप्प्यावर पोहोचली आहे. धरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शुक्रवारी (५ सप्टेंबर) दुपारी ३.०० वाजता काटेपूर्णा प्रकल्पाचे आठही दरवाजे ६० सें.मी. उंचीने उघडण्यात आले असून, एकूण ३८४.४६ क्यूमेक्स इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. पूर नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार या विसर्गात वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांनी विशेष सतर्क राहावे, नदीपात्र ओलांडू नये, तसेच जनावरे व शेती उपकरणे सुरक्षित स्थळी हलवावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला पूरस्थितीवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, दगडपारवा प्रकल्पातही १० सें.मी. उंचीचा एक दरवाजा उघडण्यात आला असून, त्यातून ४.१४ घनमीटर प्रति सेकंद इतका विसर्ग सुरू आहे. या प्रकल्पाची पाण्याची पातळी ३१७.२० मीटर इतकी असून, सध्या तो १०० टक्के क्षमतेने भरलेला आहे.

# कापशी रोडवर भीषण अपघात;एक ठार तर ३ गंभीर

## सर्व्हिस रोडच्या अभावी अपघातांचा सिलसिला कायम

**कापशी,दि ७ (प्रतिनिधी) :** शनिवारी सायंकाळी गणेश विसर्जनाच्या दिवशी मुसळधार पाऊस कोसळत असताना कापशी तलावावर गणेश विसर्जनासाठी गेलेल्या गणेश भक्तांच्या दुसाकीला समोरून येणाऱ्या कारणे जोरदार धडक दिल्याने एका गणेश भक्ताचा जागी मृत्यू तर अन्य तिघे गणेश भक्त गंभीर जखमी झाल्याने शिवसेना वसाहत मध्ये दुःखाचे सावट निर्माण झाले आहे.शहरात गणेश विसर्जन उत्साहाने सुरू असताना अकोला शहरा नजिक एक दुर्दैवी घटना घडली आहे. पातूर-अकोला रस्त्यावर गणेश विसर्जन करून परतणाऱ्या 'जय बजरंग गणेश उत्सव मंडळा'च्या कार्यकर्त्यांच्या दुचाकीला भीषण अपघात झाला.या अपघातात एका २५ वर्षांच्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून, अन्य ३ जण गंभीर जखमी झाले आहेत.या अपघाताबाबत मिळालेल्या माहितीनुसार, 'जय बजरंग गणेश उत्सव मंडळा'चे सदस्य गणेश विसर्जन करून कापशी तलावावरून अकोल्यातील आपल्या



घरी परत येत होते. दुर्दैवाने, त्याच वेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या एका कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला. दुचाकीवरील चारही रस्त्यावर फेकले गेले तरुण या अपघातात २५ वर्षीय रामचंद्र बबन आंधळे याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेले, रविंद्र माळी, विनोद डांगे आणि राहुल सुरेश खोंड हे ३ जण जखमी झाले आहेत. या सर्व जखमींना तातडीने अकोल्यातील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे सर्व तरुण अकोल्यातील शिवसेना वसाहतीचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. अपघाताची माहिती मिळताच पातूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघातग्रस्तवाहने ताब्यात घेतली असून, या घटनेची सखोल चौकशी सुरू आहे. गणेश विसर्जनाच्या आनंदावर या दुर्दैवी घटने ने विरजण पडले असून, शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे, काल कापशी तलावावर गणेश विसर्जनासाठी एवढी गर्दी झाली होती की या चिखलातून घसरून अनेक जण जखमी झाले विशेषता अनेक महिला पाय घसरून पडल्याने त्यांना फजितीचा सामना करावा लागला ही घटना घडली तेव्हा मुसळधार पाऊस सुरू होता अपघातातील जखमींना मदत करण्याऐवजी लोक घटनेचे मोबाईलवर शूटिंग करण्यात व्यस्त दिसून आले ही दु:खाची बाब आहे.

# विद्युत खांबावर आदळून चारचाकी वाहन पडले खड्ड्यात

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :** शहरात अग्रसेन चौक ते स्टेशन चौक दरम्यान महानगरपालिका, ठेकेदार आणि विद्युत विभाग यांच्या नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे जीवाला धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी संथ गतीने सुरू असलेले डिव्हायडरचे काम वाहन चालकांच्या जीवावर उठले आहे. रात्री साधारण ११.३० वाजताच्या सुमारास टाटा एस गाडी क्रमांक चक ०४१६८१ हे वाहन विद्युत खांबावर आदळून थेट डिव्हायडरसाठी खोदलेल्या खड्ड्यात पडले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मोठी दुर्घटना टळली. खोदकाम सुरू असल्याने या ठिकाणाचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आल्यामुळे रस्त्यावर अंधार पसरला आहे. रस्त्याचे किंवा डिव्हायडरचे काम सुरू असतांना सूचना फलक, सुरक्षा बॅरिकेड्स, तसेच योग्य प्रकाशयोजना कंत्राटदाराने लावणे अपेक्षित असताना सूचनाफलक किंवा सुरक्षा बॅरिकेट्स का लावले नाहीत असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. संथ गतीने सुरू असलेल्या या डिव्हायडरच्या कामामुळे महानगरपालिका, ठेकेदार आणि विद्युत विभाग यांच्या निष्काळजीपणामुळे नियमित प्रवास करणाऱ्या वाहनधारकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# मार्केट यार्डवर नवीन मुगाच्या खरेदीचा शुभारंभ

**तेल्हारा,दि ७ (प्रतिनिधी) :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती च्या मार्कट यार्ड वर आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी नविन मुगाच्या खरेदीचा शुभारंभ कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती शाम किसनराव घोंगे यांच्या शुभहस्ते पार पडला यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती चे उपसभापती हरिदास वाघ , पुंडलीकराव अरबट, शातांराम काळे, प्रा प्रदिप ढोले, दामोदर मार्के, गौरव यादगिरे, डॉ अशोकराव बिहाडे, सौ विजया शंकरराव ताथोड, गणेशराव वाघोडे, सौ वंदना गणेशराव वाघोडे, संदीप खारोडे रवीन्द्र बिहाडे, मोहन पाथ्रीकर, सुनिल इंगळे, निरंजन राजनकर, हरिष तापडिया, राजेश टेकडीवाल सुभाष खाडे शंकरराव ताथोड बाजार समिती प्रभारी सचिव सुरेश सोनोने व्यापारी पप्पुसेठ केला, राजु केला, संतोष टावरी, गोपाल पालीवाल, बिरजसेठ केला, विलास आप्पा साखरे श्रीकृष्ण तांबडे यावेळी उपस्थित होतेयावेळी तालुक्यातील वाडी अदमपुर येथील शेतकरी संतोष कोतकार या शेतकऱ्यांनी



विक्री साठी आणलेल्या मुगाला ५६०१ रुपये भाव देवुन मुगाची खरेदी करण्यात आली यावेळी तेल्हारा कृषी कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती शाम किसनराव घोंगे यांच्या हस्ते शेतकरी संतोष कोतकार यांचा शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला यावेळी तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती चे व्यापारी अडते , कर्मचारी मोहन बोरसे,पुरुषोतम खाडे, सौरभ पाथ्रीकर,सतोष सोनोने सत्यविजय आखरे आदि उपस्थित होते.

# तेल्हारा येथे ढोलताशाच्या गजरात गणेश विसर्जन शांततेत

**तेल्हारा,दि ७ (प्रतिनिधी) :** शहरात दहा दिवस गणेशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. सोमवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप देताना शहरात भक्तीभाव,उत्साह आणि ढोल-ताशांच्या गजराचे सूर दुमदुमणारे अनुभवायला मिळाले. पारंपरिक मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि टाळ-मृदंगाच्या तालावर भक्तगणांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा घोषणांनी वातावरण भारावून टाकले.गणेश विसर्जन सोहळ्यासाठी शहरातील प्रमुख मार्गांवरून मिरवणुका निघाल्या. पोलिस प्रशासनाने योग्य नियोजन करून वाहतूक नियंत्रणात ठेवली.

त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. विसर्जन स्थळांवर



नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. महिलांचा,युवकांचा व लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षणीय होता. तथापि, यंदाच्या विसर्जनात एक वेगळेच चित्र पाहायला मिळाले. नगरपरिषदेचा एकही कर्मचारी विसर्जन सोहळ्यात हजर नव्हता. शहरातील प्रमुख रस्त्यांवर स्वच्छता करण्यासाठी अधिकाऱ्यांची वा कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिसून आली नाही. त्यामुळे विसर्जनानंतर उरलेला कचरा, पूजेतील साहित्य आणि सजावटीच्या वस्तूंची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी नागरिकांवरच पडली. नागरिकांनी व काही स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेत मिरवणूक मार्ग परिसरात स्वच्छता मोहिम राबवली. भाविकांनी स्वतः च्या सहभागातून विसर्जनानंतरचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा आदर्श दाखवला. नगरपरिषदेच्या पण निष्काळजीपणाबद्दल लोकांमध्ये नाराजी व्यक्त होताना दिसली. 'गणेशोत्सव हा शहराचा मोठा सण असून नगरपरिषद जबाबदारी टाळत आहे,' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. विसर्जन सोहळ्यात अनेक मंडळांनी पारंपरिक नृत्य, ढोल-ताशा, लेझीम, फटाक्यांची आतषबाजी आदींनी उत्साह वाढवला.

भाविकांनी भक्तिभावाने बाप्पाला निरोप दिला. संपूर्ण शहरात कोणताही अनुचित प्रकार न घडता विसर्जन सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. नागरिकांच्या स्वयंप्रेरणा आणि सहभागामुळेच सोहळा यशस्वीरीत्या पार पडल्यानंतरही प्रशासनाच्या निष्क्रियतेकडे बोटे उठत आहेत.

# सोयाबीन पीक विविध आजाराने नष्ट

## कृषि विभागाने केली पिकाची पाहणी

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :** यावर्षी सुरुवातीपासून पावसाळा व्यवस्थित असल्यामुळे सर्वच पिकं समाधानकारक होते मात्र गेल्या महिन्यापासून पिकांवर विविध आजार आल्याने पिके नष्ट झाली व शेतकऱ्यांच्या तोंडचा घास गेला आहे त्यामुळे शेतकरी आणखी संकटात सापडला आहे सततच्या पावसामुळे सोयाबीन पीकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव, लष्करी आणि इतर अळ्यांचे प्रमाण वाढले असून, यासंदर्भात अकोला तालुका कृषी विभागाच्या वतीने परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन गुरुवार दि. ४ सप्टेंबर रोजी पाहणी करून शेतक- यांना मार्गदर्शन केले. गेल्या १६ ऑगस्ट पासून अतिवृष्टी नंतर जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून, पिकांची आंतर मशागत आणि फवारण्या करणे कठीण झाले आहे. अतिपावसामूळे सोयाबीन कापूस पीक पाण्याखाली गेले आहे. विविध अळ्यांच्या प्रादुर्भावासह, बुरशीजन्य रोग, सोयाबीन पिवळे पडणे, यलो मोझाक मुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी पूर्णता अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत कृषी विभागाची संपूर्ण टीम कामाला लागली असून बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि धीर देण्याचे कामकृषी विभागाकडून करण्यात आले या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांच्यासह, अकोल्याचे तालुका कृषी अधिकारी विलास वाशीमकार, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रकाश घाटोळ, डॉ. श्रीकांत ब्राम्हणकर, डॉ. पी. के. राठोड, उपकृषी अधिकारी मनीषा जोशी, सहायक कृषी अधिकारी संजय जाधव, अजय देशमुखयांनी बोरगाव मंजू परिसरातील अनवी, मिर्झापुर, राजापूर, पैलपाडा परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत मार्गदर्शन केले. यावेळी संजय बसू पवन जयस्वाल मोहन नवलकर विकास पाटील काकड शंकर वसु बाबाराव धोत्रे सागर राऊत दिलीप लहाने गुलाब नागे देवानंद नायडेकर प्रकाश लहाळे प्रकाश वसु आदि शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारसच्या विद्यार्थिनीचे यश

**पारस :** सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. मुलांना शालेय अभ्यासासोबतच बौद्धिक विकासासाठी इतर माध्यमांचा वापर करण्याची आवश्यकता आहे. यासाठी बुद्धिबळ महत्त्वाचे आहे. स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारसच्या विद्यार्थ्यांनी रविवार, ३१/०८/२०२५ रोजी खामगाव येथे झालेल्या एकदिवसीय अंडर- ७ रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत इयत्ता पहिलीच्या दुर्वा अकोटे हिने ट्रॉफी आणि प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा जे.सी. आय. खामगाव येथे आयोजित करण्यात आली होती.

# बाभूळगावला ईद निमित्त मिरवणूक

बाभूळगाव : ईद-ए-मिलादुननबी सण शुक्रवारी जल्लोषात साजरा करण्यातआला. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या एक हजार पाचशेवा जन्मदिन निमित्त मिरवणूक काढली. शहरातील बाबा हुसेन शहा वली यांच्या दर्गावरून निघालेली भव्यदिव्य लक्षवेधी जुलुस (मिरवणूक) मुख्यमार्गाने मार्गक्रम करीत दर्गाजवळ पोहचली. येथे फातिहा शरीफ होवून प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावर्षीच्या मिरवणूकीत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मस्थळ शहरातील काबा शरीफ व मदिना शरीफ शहरातील गुंबज-ए-खजरा याची प्रतिकृती मुस्लीम



बांधवांसह शहरवासियांसाठी लक्षवेधी ठरली. शहरातील मुख्य मार्गातील ठिक-ठिकाणी मुस्लीम तरूणांकडून गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले. मिरवणूकीनंतर सांस्कृतिक भवनमध्ये लंगर (महाप्रसाद) चा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जामा मस्जिदचे मौलाना सलाउद्दीन रजा, गौसिया मस्जिदचे मौलाना, न. प. आरोग्य सभापती शेख कादर भाई, शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख शब्बीर खान, बांधकाम सभापती जाकीर खान, नगरसेवक शेख बबलु, नईम खान, आरीफ खान, सलीम खान, मो. सलीम, शेख आसिफ, साबीर शेख, रसुल बेग सहभागी झाले होते.

# भागवताचार्य गणेश महाराज गिरी यांचे निधन



**जामठी बु. :** येथून जवळच असलेल्या सोनोरी (बपोरी) येथील भागवताचार्य तथा वारकरी साहित्य परिषद मुर्तीजापूर तालुका माजी अध्यक्ष गणेश गीरी महाराज (७४ ) यांचे दि .७ ला अल्पशा आजाराने निधन झाले .त्यांचे मागे पत्नी, एक मुलगा, दोन मुली व मोठा परिवार आहे. ह.भ प विष्णुपंत खरड यांचे मार्गदर्शनात दिंडी काढण्यात आली. त्यांचेवर सोनोरी येथे असंख्य चाहत्यांचे उपस्थितीत अंतीम संस्कार करण्यात आलेत. या प्रसंगी आमदार हरीशभाऊ पिंपळे, वारकरी साहित्य परिषद जिल्हा अध्यक्ष शिवशंकर पाटील, तालुका अध्यक्ष अजाबराव महाराज वहिले, उपाध्यक्ष पुरुषोत्तम महाराज बोळे ,सुभाष राऊत, गोपाल काळे, बुरघाटे सर, गजानन वैद्य, माजी सभापती बबनराव डाबेराव आदी मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. भागवत, किर्तन, प्रवचन, तीर्थक्षेत्र दर्शन, चातुमर्सात ग्रंथ वाचन या माध्यमातून भागवत धर्माचा प्रसार जास्तीत जास्त प्रमाणात करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला.

# युवकांनी वाईट व्यसनाला पुर्णविराम देऊन स्वतंत्र उदोगाचा श्री गणेशा करा : संदिपपाल महाराज

**तेल्हारा,दि ७ (प्रतिनिधी) :** शेगाव नाक्यावर येथिल उंबरकर कॉम्प्लेक्समधे प्रशांतभाऊ डिक्कर मित्र परिवार यांच्या संकल्पनेतून आणि शेगाव नाका मित्र परिवार यांच्या सहकार्याने सप्तखंजिरी वादक संदिपपाल महाराज ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रबोधनात्मक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला तालुक्यातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते संदिपपाल महाराज यांचा सत्कार करुन करण्यात आला. त्यानंतर संदिपपाल महाराज यांनी आपल्या सुमधुर सप्तखंजिरी वादनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि प्रबोधनात्मक संदेशाद्वारे सकारात्मक प्रभाव टाकला. युवकांनी व्यसानाला पुर्णविराम द्या. आणि स्वतंत्र उद्योगाचा श्री गणेशा करा असे किर्तनातुन महाराज यांनी संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान, संदिपपाल महाराज यांच्या विनंतीवरून प्रशांतभाऊ डिक्कर यांनी शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी बच्चुभाऊ कडु यांनी २८ ऑक्टोबर रोजी मंत्रालयावर आपल्या न्याय हक्कासाठी





पुकारलेल्या आंदोलनात लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांना केले.प्रशांतभाऊ डिक्कर मित्र परिवार आणि शेगाव नाका मित्र परिवार यांच्या या उपक्रमाचे तेल्हारा शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाने सामाजिक एकता आणि सांस्कृतिक जागृतीला चालना देत एक नवा आदर्श निर्माण केला. यावेळी अनिल तायडे, संजय रोहनकार(अंदुरा)दादाभाऊ टोहरे,रामदादा फाटकर,सोनु मलिये, गोपाळ पाटील (मेहकर) राजेश वानखडे,संदिपराव फाटकर, रामेश्वर हागे, आशिष शेळके,दत्ता थारकर, चंद्रकांत मोरे,लोणाग्रे महाराज, रमेश पाटील, ह.भ.प.बाळकृष्ण महाराज वाकोडे, तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणेश आमले, अक्षय बुजबुले,प्रतिक पाथ्रिकर,चेतन पिंपळकार,सचिन गोरे,अक्षय अस्वार,शाम मोहे,गोपाळ खरसान,सागर गोरे,प्रज्वल लव्हाळे,आदेश महाले,प्रज्वल मोहोळ,राजेश गणगे,आशु पुरी,राम सुईवाल,सौरभ पाथ्रिकर, नितीन भातुरकर, संतोष झुंझळकार,अक्षय इंगळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.


## पाहिजेत

**श्रीहंस शिक्षण क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळ, पिंपळखुटा भाषीक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त द्वारा संचालित**

**श्री बळीराम सिरस्कार प्राथमिक/माध्यमिक आश्रम शाळा, पिंपळखुटा ता. बार्शिटाकळी जि.अकोला**

१) शासन निर्णय विभाशा-२०२०/प्र.क्र.४७८/विजाभज-२, मंत्रालय मुंबई दि.१६.१२.२०२०
२) शासन निर्णय विभाशा-२०२२/प्र.क्र.७४/विजाभज/१, मंत्रालय मुंबई दि.०९.०६.२०१२
३) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.४०६९ दि.१३.०८.२०२१
४) मा. सहा. संचालक इतर बहूजन कल्याण कार्यालय, अकोला यांचे संच मान्यता प्रत्र क्र.५०२ दि.०५.०७.२०२४
५) शासन निर्णय क्र. व्हिओसी-२०१७/पत्र क्र.४/व्याशी-४, मंत्रालय मुंबई दि.१२.०९.२०१७
६) शासन परिपत्रक क्र. विभशा-२०२०/प्र.क्र.५२३/विजाभज-२, मंत्रालय मुंबई दि.१९.१०.२०२०

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | वेतन व भत्ते |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक -१ | पदवीधर, बि.एड् व ५ वर्षाचा अनुभव | - | शासन नियमाप्रमाणे राहील |
| २ | सहा. शिक्षक-१ | एम.ए. (इंग्रजी) व बि.एड् | - | |
| ३ | कनिष्ठ लिपीक-१ | एच.एस.सी. पास, टंकलेखन मराठी/इंग्रजी ३०/४० | - | |
| ४ | प्रयोगशाळा परिचर-१ | १० वी पास | - | |
| ५ | शिपाई -३ | ४ थी पास | - | |
| ६ | स्वयंपाकी-२ | ४ थी पास | - | |
| ७ | मदतनिस-१ | ४ थी पास | - | |
| ८ | कामाठी-१ | ४ थी पास | | |

इच्छुक उमेदवाराने विनंती अर्ज, मुळ कागदपत्र सत्यप्रतीसह दि.१४.०९.२०२५ रोजी रविवारी सकाळी ११ ते २ मुलाखतीकरीता हजर राहावे.

**स्थळ : श्री बळीराम सिरस्कार प्राथमिक/माध्यमिक आश्रम शाळा, पिंपळखुटा ता. बार्शिटाकळी जि.अकोला**

मुख्याध्यापक

अध्यक्ष
श्रीहंस शिक्षण क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळ, पिंपळखुटा
मो.नं.८६६९०३०६६३



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descrciption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | TIC-I / Rfx No. 3000061600 / Annual maintenance contract for operation and maintenance of 4 MWp solar power plant for 2 years CSTPS, Chandrapur / Rs.15843755.20/- |
| 2 | Coal Co-ordination / Rfx No. 3000061584 / Work of segregation & removal of extraneous material from idle lying coal at various locations along with loading and transportation of segregated coal / extraneous material within Coal Handling Plant yard of Chandrapur CSTPS on as and when required basis / Rs.6876000/- |
| 3 | CHP-D / Rfx No. 3000061592 / Procurement of Hydraulic Pumps for Stacker Reclaimer at CHP-D, CSTPS / Rs.477340/- |
| 4 | ODP-II / Rfx No. 3000061603 / Work of servicing / Replacement of sump selection valves in Ash Handling Plant of Unit-7, during the overhaul period at CSTPS, Chandrapur / Rs.514846.57/- |
| 5 | EM-II / Rfx No. 3000061571 / Work of replacement of 200MVA, 21/400KV BHEL make GTR-7Y transformer along with internal inspection at Unit-7, 500MW, CSTPS, Chandrapur / Rs.1795364.12/- |
| 6 | BM-II / Rfx No. 3000061586 / Work contract for Phased Array Ultrasonic Inspection ( PAUT ) of weld joints of boiler tubes in Unit-5 during AOH at CSTPS, Chandrapur / Rs.298000/- |
| 7 | BM-II / Rfx No. 3000061619 / Work of servicing of Wall Soot Blowers in Unit-5, 500 MW BHEL Boiler during AOH at CSTPS, Chandrapur / Rs.507971/- |
| 8 | BM-II / Rfx No. 3000061626 / Procurement of Water wall soot blower sleeves, trapezoidal bars, scallop bars in Unit-5 (500MW) BHEL Boiler during AOH at CSTPS, Chandrapur / Rs.377800/- |
| 9 | TECH / Rfx No. 3000061636 / Annual contract for hiring of 2 Nos vehicles (Bolero, Scorpio or Equivalent) round the clock at CSTPS, Chandrapur for the period of two years / Rs.3128780/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 09)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# बालांगण



## सोडा 'बिंजे इटिंग'

मुलांनो, 'बिंजे इटिंग' म्हणजे उगाचच खात राहणं. 'बिंजे इटिंग' हा एक आजार आहे. पोटभर खाणं गरजेचं असतं. पण पोट भरल्यानंतरही खावंसं वाटलं तर ते बिंजे इटिंगचं लक्षण असू शकतं. आता या बिंजे इंटिंगची समस्या सोडवण्यासाठी काही उपाय करता येतील. चला तर मग याबाबत माहिती घेऊ.

थोड्या वेळानंतर खाण्यासाठी अन्न लपवून किंवा साठवून ठेवणं, पोट भरलेलं असतानाही खात राहणं, जेवणाच्या ठरलेल्या वेळा नसणं, दिवसभर चरत बसणं, सगळ्यांसमोर नेहमीप्रमाणे खाणं पण एकटं असताना भरपूर आणि बकाबक खाणं, खाणं थांबवता न येणं, खूप कमी वेळात भरपूर खाणं ही बिंजे इटिंगची लक्षणं आहेत.

ही समस्या सोडवण्यासाठी खाण्याचा मोह टाळायला हवा. म्हणजे बघा, आपल्याला वेफर्स, पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, चॉकलेट, केक असं जंक फूड आवडतं. हेच पदार्थ जास्त खाल्ले जातात. त्यामुळे हे पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवायला हवं. अन्नाशी तुमचं नातं निर्माण व्हायला हवं. अन्न आरोग्यासाठी गरजेचं आहे हे लक्षात ठेवा. आपल्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी खाऊ नका. शरीराला पोषक घटक मिळवून देण्यासाठी खायला हवं हे नेहमी लक्षात ठेवा.

हेल्थवेल्थ

दोस्तांनो, भूक फक्त शारीरिक नसते तर ती भावनिकही असते. म्हणजे आपल्याला उगाचच खावंसं वाटतं. नुकतंच जेवण झाल्यानंतरही गोड खावंसं वाटतं. पण शरीराला या खाण्याची गरज नसते. त्यामुळे गोड खावंसं वाटलं तरी ते टाळायला हवं. अजिबात उपाशी राहू नका. उपाशी राहिल्यामुळे जास्त खाल्लं जातं. खाण्यापिण्याच्या वेळा ठरवा. त्याच वेळी खा. खाण्याच्या वेळा टाळल्यामुळे जंक फूड खावंसं वाटतं. आहारात पोषक पदार्थांचा समावेश करा. फळं, सुकामेवा असे आरोग्यदायी पदार्थ खा.

## आकाशाचा डोळा: ड्रोन कॅमेरा

ड्रोन म्हणजे यूएवी म्हणजेच अनमॅनड एरियल व्हेईकल. ड्रोनला उडता रोबोट असंही म्हणता येईल. आपण हा रोबोट रिमोट कंट्रोलद्वारे नियंत्रित करू शकतो. ज्या ठिकाणी माणूस पोचणे अवघड आहे त्या ठिकाणी ड्रोन सेट केला जातो. क्वाडकोप्टर हे ड्रोनचं अगदी प्राथमिक स्वरूपाचं डिझाईन आहे. १९२० साली ह्या प्रकारचा ड्रोन सर्वात प्रथम उडवण्यात आला.बदलत्या टेक्नॉलॉजीमुळे यात अनेक सुधारणा झाल्या. सेन्सर आणि कॅमेरा मध्ये सुधारणा होत गेली. ड्रोनची बॅटरी आणि त्याचं वजन यावर त्याचं आकाशात उडत राहणं अवलंबून असतं. ड्रोन हेलिकॉप्टरसारखा हवेत उडवला जातो आणि रिमोटने नियंत्रित केला जातो. त्याच्या कॅमेरामुळे जमिनीवरच्या दृश्यांचे शूटिंग स्पष्ट आणि नीट केले जाते. अनेक रिसर्च आणि



रेस्क्यू ऑपरेशनमध्ये ड्रोनचा वापर केला जातो. ट्रॅफिक नियंत्रित करण्यासाठी, हवामानाचा अंदाज घेण्यासाठी ड्रोनचा उपयोग केला जातो. आकाशातून फोटोग्राफी करण्यासाठी तसंच खेळाच्या सामन्यांचं प्रक्षेपण करण्यासाठीदेखील ड्रोनचा वापर केला जातो. अलीकडे शेतीच्या विविध कामांमध्ये ड्रोनचा उपयोग केला जाऊ लागला आहे.

जाणून घ्या

मिलिटरीमध्ये ड्रोनचा वापर दिवसेंदिवस वाढू लागला आहे. हेरगिरीसाठी वापरण्यात येणारे ड्रोनआजच्या जगातले सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. हवाई दलाच्या गोरगोन सेन्सर असलेले रीपर प्रकारचे ड्रोन १२ कोनांमधून चार किलोमीटर क्षेत्रावर लक्ष ठेवते. तर पेंटोगोनच्या एका संस्थेतर्फे विकसित केलेली आरगस इमेजिंग सिस्टीम वीसहजार फूट उंचीवरून सहा इंचाच्या वस्तूंचेसुद्धा फोटो काढू शकतात. ड्रोन हे नव्या युगाचे नवे तंत्रज्ञान जर योग्य रीतीने वापरले गेले तर वरदान ठरेल यात काही शंका नाही. नुकत्याच पाकिस्तानवर केलेल्या कारवाईत भारतीय हवाई दलाच्या ड्रोन्सने महत्वाची कामगिरी बजावली हे तर तुम्हाला माहीत आहेच.




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१)छत्तीसगड राज्याचा प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
२) उरूग्वेचं चलन कोणतं?
३) मंगोलियाची राजधानी कोणती?
४) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या देशात आयोजित करण्यात आला होता?
५) हल्दिया बंदर कोणत्या राज्यात आहे?
६) पुलित्झर पारितोषिक कोणत्या देशातर्फे दिलं जातं?
७) ईझार चषक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
८) रणजी करंडक कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
९) भारतातली पहिली महिला बँक कोणती?
१०) सार्वजनिक ठिकाणी वायफाय सुविधा उपलब्ध करून देणारं भारतातलं पहिलं शहर कोणतं?

उत्तरं : १) राउत नाचा २) पेसो ३) उल्लनबातर ४) कतार ५) पश्चिम बंगाल ६) अमेरिका ७) पोलो ८)क्रिकेट ९) भारतीय महिला बँक १०) मुंबई

## आधुनिक काळातलं ऑफिस मॅनेजमेंट

दोस्तांनो, उद्योग-व्यवसायाच्या पद्धती बदलल्या आहेत. सगळं कसं आधुनिक झालं आहे. आजघडीला उद्योजक तंत्रज्ञानाची मदत घेतात. म्हणूनच आधुनिक कार्यालयाचं म्हणजे ऑफिसचं व्यवस्थापन हे किचकट काम होऊन बसलं आहे. ऑफिसचं व्यवस्थापन आता सोपं राहिलेलं नाही. एक व्यवस्थापक कंपनी आणि ग्राहकांमधला दुवा बनतो. तुम्हीही आधुनिक ऑफिस मॅनेजमेंटच्या क्षेत्रात करिअर करू शकता. या क्षेत्राबद्दलचं हे मार्गदर्शन...

■ 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट अँड सेक्रेटरियल प्रॅक्टिस'सारखे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पुढे जाऊ शकता. यासोबतच 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट', 'मॉडर्न ऑफिस प्रॅक्टिस' या विषयांमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. बारावीनंतर या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. पदवी पूर्ण करण्याआधीही तुम्ही हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. पदवी पूर्ण केल्यानंतर 'मॉडर्न ऑफिस मॅनेजमेंट' हा विषय घेऊन एमबीएही करता येतं.

कोण होणार?

■ या क्षेत्रात येण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य आणि चटपटीतपणा असायला हवा. इंग्रजीसह हिंदी आणि स्थानिक भाषेवर प्रभुत्व असल्यास लाभ होऊ शकतो. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर छोट्या कंपनीपासून सुरूवात करता येईल. अनुभव मिळाल्यानंतर मोठ्या, बहुराष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते.

■ जनरल किंवा असिस्टंट मॅनेजरच्या पदापासून या क्षेत्रातल्या करिअरला सुरूवात करता येते. पुढे 'एक्झिक्युटिव्ह असिस्टंट' म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

## पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज

दोस्तांनो, मोबाईल क्रांतीमुळे टेक्स्ट मेसेज सर्रास पाठवले जातात. या संदेशांचं काहीच अप्रूप राहिलेलं नाही. पण कधीतरी पहिला टेक्स्ट मेसेज पाठवण्यात आला होता. त्यावेळी या मेसेजबद्दल प्रचंड कुतुहल असणार हे नक्की! चला तर मग या पहिल्या टेक्स्ट मेसेजविषयी जाणून घेऊ.




पहिलावाहिला टेक्स्ट मेसेज २७ वर्षांपूर्वी म्हणजे १९९२ मध्ये पाठवण्यात आला होता. ३ डिसेंबर १९९२ या दिवशी हा मेसेज पाठवण्यात आला. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या विचार केला तर टेक्स्ट मेसेजने २७ वर्षं पूर्ण केली आहेत. इंग्लंडमधल्या एका इंजिनिअरने 'मेरी ख्रिसमस' हा संदेश पाठवला होता. नील पॅपवर्थ असं या इंजिनिअरचं नाव. त्याने हा मेसेज रिचर्ड जार्व्हिस यांच्या मोबाईलवर पाठवला. जार्व्हिस हे त्यावेळी व्होडाफोन यूकेचे अध्यक्ष होते.

जाणून घ्या

आज आपल्या मोबाईलला की बोर्ड असतो. पण त्यावेळी या की बोर्डचा शोध लागला नव्हता. म्हणजे त्यावेळी मोबाईलला की बोर्ड नसायचा. त्यामुळे पॅपवर्थने कॉम्प्युटरवर हा मेसेज टाईप केला. रिचर्ड ख्रिसमस पार्टीला गेले असताना त्यांच्या मोबाईलवर हा संदेश झळकला. आज आपण अगदी सहज मेसेज पाठवू शकतो. ९० सेकंद म्हणजे दीड मिनिटांमध्ये मेसेजला प्रतिसाद दिला जातो पण २७ वर्षांपूर्वी मेसेज पाठवणं सोपं नव्हतं हेच खरं!

## हिऱ्यांची राजधानी सुरत

दोस्तांनो, सुरत हे गुजरात राज्यातलं प्रमुख शहर आहे. सुरत हे हिरे व्यापाराचं केंद्र बनून गेलं आहे. इथे कापड उद्योगही मोठ्या प्रमाणावर आहे. सुरतला 'हिऱ्यांची राजधानी' असं म्हटलं जातं. जवळपास ९५ टक्के हिऱ्यांना सुरतमध्येच पैलू पाडले जातात. सुरत हे देशातलं आठव्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर आहे. या शहराची लोकसंख्या ४५ लाखांच्या घरात आहे. सुरतमध्ये सर्वाधिक पूल आहेत. म्हणूनच सुरतला उड्डाणपूल म्हणजेच फ्लायओव्हर्सचं शहर असंही म्हटलं जातं.

सुरतमधून कापडाची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते. लग्नप्रसंगी सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या कापडाची निर्मिती सुरतमध्येच होते. इथे कापडाची खूप मोठी बाजारपेठ आहे. जिलबी, फाफडा, थेपला, ढोकळा, सुरती उंदियो, बटाटा पुरी हे खाद्यपदार्थ सुरतची ओळख आहे. सुरतमध्ये कापड गिरण्या आहेत. तसंच इथलं रेशीमही खूप प्रसिद्ध आहे. सुरत शहरात समुद्रकिनारेही आहेत. दुमास, दांडी आणि सुवाली हे इथले प्रसिद्ध समुद्रकिनारे आहेत. दुमास समुद्रकिनाऱ्यावरची वाळू काळ्या रंगाची आहे.



सफर शहरांची



## जपानचं वेगळेपण

जपान हा देश ६८०० लहान लहान बेटांपासून बनलेला आहे. इथले लोक अत्यंत मेहनती म्हणून ओळखले जातात. जपानला उगवत्या सूर्याचा देश म्हटलं जातं. जपानमध्ये दरवर्षी सुमारे ४००० भूकंप होतात. म्हणजे प्रत्येक दिवशी इथं ४ भूकंप होतात. एवढे भूकंप होत असूनही जपांची अर्थव्यवस्था अत्यंत बळकट आहे. जपानचं वैशिष्ट्य म्हणजे मुलं दहा वर्षांची होईपर्यंत त्यांना इथं कोणतीही परीक्षा द्यावी लागत नाही. इथं शाळेत आल्यावर मुलं आणि शिक्षक एकत्र येऊन आपापले वर्ग स्वच्छ करतात. जपानच्या लोकांचं जगण्याचं सरासरी वय ८२ वर्ष आहे. संपूर्ण जगात हे वय सर्वात जास्त मानलं जातं. जपानमध्ये १०० वर्षांपेक्षा जास्त वय असणारे ५०००० पेक्षा जास्त लोक आहेत. सुमो हा जपानचा अतिशय लोकप्रिय खेळ आहे. त्याखालोखाल जपानी लोकांना बेसबॉल हा खेळ आवडतो. जपानमध्ये नवीन वर्षाचा उत्सव साजरा करताना तिथल्या मंदिरांमध्ये १०८ घंटा वाजवल्या जातात. काळी मांजर जपानमध्ये लकी समजली जाते. जपानमध्ये ५५ लाख व्हेंडिंग मशीन्स आहेत आणि त्यातून केळी , नूडल्स आणि अंडी पुरवली जातात. जपान हा जगातला एकमेव देश आहे की ज्यावर अणुबॉम्ब टाकला गेला. हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर लिटिल बॉय आणि फॅट मॅन हे अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. पण त्या धक्क्यातून सावरून जपान आज अत्यंत प्रगत देश म्हणून ठामपणे उभा आहे.

सफर देशांची



## यम्मी फ्रूट कस्टर्ड


छोट्या दोस्तांनो, घरात सगळ्यांना आवडेल आणि करायला एकदम सोपा असा पदार्थ म्हणजे फ्रूट कस्टर्ड.

**साहित्य** : कस्टर्ड पावडर, १ लीटर दूध, साखर , फळं . सफरचंद, डाळिंब, द्राक्ष, चिक्कू आणि तुमच्या आवडीची फळं घेऊ शकता.


**कृती** : सर्व फळं साली आणि बिया काढून चिरून घ्या. गार होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. एक वाटी दुधात कस्टर्ड पावडर मिसळून घ्या अगदी एकजीव होऊ द्या. नंतर उरलेलं दूध तापवा. चांगलं उकळू द्या. मग कस्टर्ड मिसळलेलं दूध गरम दुधात घालून तापवत रहा. गॅस बंद करा. दूध गार झाले की फ्रिजमध्ये ठेवा. ३ ते ४ तासांनी दूध थंड झाले की चिरलेली फळं त्यात मिक्स करा. आरोग्यदायी आणि स्वादिष्ट फ्रूट कस्टर्ड तयार.

खादाडी

रात्री घरातले सगळे गप्पा मारत बसले की मस्तपैकी बाउलमध्ये घालून सगळ्यांना सर्व्ह करा.



ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त

### पांढरा हत्ती



मुलांनो, पांढरा शुभ्र हत्ती असतो. या हत्तीला 'अल्बिनो' असंही म्हणतात. पांढरा हत्ती ही दुर्मिळ प्रजाती आहे. त्यांची संख्या खूप कमी आहे. थायलंडमध्ये पांढरे हत्ती मोठ्या संख्येने आढळतात. म्हणून या देशाला 'पांढऱ्या हत्तींची भूमी' असं म्हटलं जातं. या हत्तींच्या त्वचेचा रंग लांबून पांढरा शुभ्र दिसत असला तरी त्याला लालसर राखाडी झाक असते. हे हत्ती भिजल्यावर त्यांची त्वचा गुलाबी रंगाची दिसू लागते. हत्ती हा बौद्ध धर्माचं प्रतीक मानला जातो. या हत्तींचा वापर राजेशाही समारंभांमध्ये केला जातो.

खादाडी

### चॉकलेट कॅरॅमल्स



चॉकलेट कोणाला आवडत नाही.चॉकलेटपासून मस्तपैकी 'चॉकलेट कॅरॅमल' हा पदार्थ तयार करता येईल. यासाठी एक चमचा बटर, एक कप साखर, पाऊण कप कॉर्न सिरप, चॉकलेटचे तुकडे (हे चॉकलेट गोड नसावं) दीड कप क्रीम हे साहित्य घ्या. एक अॅल्युमिनियम फॉईल घ्या. ही फॉईल पॅनवर पसरा. त्यावर बटर लावा आणि थोडा वेळ बाजूला ठेवा. आता एका सॉसपॅनमध्ये साखर, कॉर्न सीरप आणि चॉकलेट घाला. हे सगळं मिश्रण उकळा. यात अर्धा कप क्रीम घालून शिजवून घ्या. हे मिश्रण सतत हलवत रहा. आता त्यात अर्धा कप क्रीम घाला. आता हे सर्व मिश्रण अॅल्युमिनियम फॉईल लावलेल्या पॅनमध्ये घाला. साधारण पाच तास किंवा रात्रभर थांबा. आता चॉकलेट कॅरॅमल तयार आहे. या चॉकलेटच्या छोट्या वड्या करा. मित्रमैत्रिणींना खायला द्या.

स्टडी टिप्स

### मित्रमैत्रिणींसोबत सोडवा गणितं

मुलांनो, गणिताची भीती वाटत असेल तर काळजी करू नका. गणिताची आवड असणाऱ्या मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करा. एकत्र गणितं सोडवल्याने तुमची भीती कमी होईल. आपणही गणितं सोडवू शकतो, हा आत्मविश्वास मिळेल. गणिताची भीती घालवण्याचा हा खूप चांगला उपाय आहे. मित्रमैत्रिणींसोबत अभ्यास करताना तुम्हाला मजाही येईल आणि गणितंही झटपट सुटतील.



योगा टाईम

### पोटाच्या समस्या सोडवणारं उत्तान पादासन

दोस्तांनो, अधूनमधून तुमचं पोट दुखतं का, अपचनामुळे खूप त्रास होतो का, पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी काही योगासनं करता येतील. उत्तान पादासन हे असंच एक योगासन आहे. या आसनामुळे पोटाला आराम मिळतो. पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. यामुळे अन्न लवकर पचतं.



## गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह तयार करण्याची योजना : नितीन गडकरी

# एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा समारोप




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

अतिदुर्गम आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी वसतीगृह तयार करण्याची योजना असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. याठिकाणी नाममात्र दरामध्ये राहण्याची, जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. आदिवासी विद्यार्थ्यांमधून भविष्यातील डॉक्टर, इंजिनियर आणि अन्य क्षेत्रातले दिग्गज तयार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या नागपुरात चार दिवसांपासून सुरू असलेल्या एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा समारोप झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

गडचिरोली जिल्ह्यात ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कूल सुद्धा आपण मंजूर करणार आहोत. जेणेकरून, तिथे रोजगार निर्मिती होऊ शकेल, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

या समारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह नोबल पारितोषिक विजेते, चिल्ड्रन्स फाउंडेशन नवी दिल्लीचे कैलाश सत्यार्थी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, माजी खासदार अशोक नेते, लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, उपाध्यक्ष राजीव हडप, डॉ. मुरलीधर चांदेकर, सचिव प्रशांत बोपर्डीकर, कोषाध्यक्ष मिलिंद कानडे, विश्वस्त डॉ. उपेंद्र कोठेकर, सुधीर दिवे, माजी मंत्री राजकुमार बडोले, संजय पुराम, प्रा. निरंजन देशकर, रेखा बावसकर, केशवराव मानकर, पूर्व महापौर माया इवनाते यांची मंचावर उपस्थित होती.

यावेळी अतिदुर्गम गाव- खेड्यात आणि प्रतिकूल परिस्थितीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पर्यवेक्षकांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तत्पूर्वी, अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी सांगितले की या सर्व आदिवासी शाळांच्या अभ्यासक्रमाच्या प्रमाणिकरणाचे काम विद्या भारतीतर्फे करण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर, विद्याभारती, मानकर ट्रस्ट, दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या सहकार्याने हे कार्य करण्यात येणार आहे.

यशिवाय, आदिवासींसाठी हेल्थ अ‍ॅप तयार करण्यात आला असून त्यात १२ लाख लोकांचा हेल्थ डेटा स्टोअर करण्यात येईल, येणाऱ्या २ महिन्यात हे अ‍ॅप तयार होणार आहे. कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे मानकर ट्रस्ट साठी नॉलेज पार्टनर होणार आहे आणि ५८० एकर वर ट्रायबल युनिव्हर्सिटीसाठी डीपीआर ते तयार करून देण्यात सहकार्य करत आहे. मानकर ट्रस्टला सोशल स्टॉक एक्सचेंजमध्ये आपण सूचिबद्ध करणार आहे अशी माहिती त्यांनी दिली.

प्रास्ताविकातून सचिव प्रशांत बोपर्डीकर यांनी सांगितले की या प्रशिक्षण वर्गात ११८५ शिक्षक , १३८ प्रवासी कार्यकर्ता शिबिरात सहभागी झाले आहेत. प्रथमच नाशिक जिल्ह्यातील ३८ गावांमधून देखील शिक्षक आले आहेत. शासनाच्या आदिवासी विकास विभागासोबत 490 आदिवासी वसतीगृहांमध्ये संस्थेचा करार विविध उपक्रम राबविण्यासाठी झाला असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला नृत्य, गायन यांचे गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी आणि गडचिरोली जिल्ह्यातील कलाकारांनी सादरीकरण केले.

### आदिवासी विकास विभाग मानकर ट्रस्टच्या पाठीशी : अशोक उईके

दुर्गम भागात असलेल्या आदिवासी वसतीगृहामध्ये आपण छात्रावास समित्या तयार केल्या असून मानकर ट्रस्टचे पदाधिकारी यांना त्यात समाविष्ट करून सातत्याने त्यांना सहकार्य करू ,अशी भूमिका आदिवासी विकास विभागाचे मंत्री अशोक उईके यांनी मांडली.

# सोलर एक्स्प्लोझिव्ह स्फोटात दुसरा बळी

## आयसीयूत उपचार घेणाऱ्या निकेश इरपाचीचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

संरक्षण क्षेत्राला स्फोटके आणि शस्त्रात्रे पुरविणाऱ्या तसेच सुमारे ३० देशांना निर्यात करणाऱ्या सोलर ग्रुपच्या बाजारगाव येथील इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या आयुध निमार्णीत बुधवारी मध्यरात्री १२.३४ वाजताच्या सुमारास झालेल्या स्फोटात मयूर गणवीर (वय २५) ठार झाला होता. दरम्यान शनिवारी नागपुरातील दंदे हॉस्पिटलमध्ये आयसीयूत उपचार घेत असलेल्या चार कामगारांपैकी निकेश इरपाची याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान कंपनी सध्या बंद ठेवण्यात आली असून कंपनी व्यवस्थापनातर्फे मृतक कामगारांच्या कुटुंबीयांना कोणतीही मदत जाहीर करण्यात आली नसल्याचे समजते.

जखमींमध्ये हिमांशु पंचभाई, सिद्धार्थ डोंगाने, प्रभात जयश्रा, सचिन सरोदे, रविंद्र मिश्रा, योगेंद्र सिंग, सन्नी कुमार, सुरेश डोसेवार, अरूण कुमार, सुरज बिटने, बादल माणिकपुरे, प्रतिक तिवारी, निरजकुमार सातरघाडगे, आशिष तुमडाम, प्रेम सिंग, देवानंद रेवतकर, चंद्रेश भारती, रोहित चांगदेकर, निकेश इरपाची आदींचा समावेश आहे. त्यांच्यावर नागपुरातील रविनगर चौकातील दंदे हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. यापैकी सुरज कुमार, निकेश इरपाची, प्रभात जयश्रा व योगेंद्र सिंग हे आयसीयूत असून दोघे अत्यवस्थ असल्याने डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली असल्याची माहिती दंदे हॉस्पिटलने दिली आहे.

स्फोटाआधी फायर झाल्याने कामगारांना प्लांटच्या बाहेर पडण्यास वेळ मिळाला. हा स्फोट इतका भीषण होता की बाजारगावसह शिवा, सावंगासह नजीकच्या १० गावांना हादरे बसले. स्फोटाच्या आवाजाने भीतीमुळे हजारो नागरिक घराबाहेर पडले होते. कंपनीची लाखो रूपयांची उपकरणे आणि साहित्य जळून खाक झाले आहे. स्फोट झाला त्यावेळी रात्री ११ नंतरच्या शिफ्टमधील कामगार वेगवेगळ्या यूनिटमध्ये काम करीत होते. हे सर्व कामगार स्फोट झालेल्या इमारतीच्या २०० मीटर परिसरात असलेल्या प्रयोगशाळेत काम करीत होते.

## भीषण अपघातात एक ठार
# तीन जखमी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ७ :

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा गणपती विसर्जन करून येत असताना गणेश भक्तांचा मोठा अपघात झाला आहे. मोटारीने दुचाकीला धडक देऊन झालेल्या भीषण अपघातात एका गणेश भक्ताचा मृत्यू झाला तर, तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना अकोला- पातूर मार्गावर घडली. अनंत चतुर्दशीला भाविक-भक्तांनी गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. गणेश विसर्जन मिरवणूक हा अकोल्याचा एक सांस्कृतिक ठेवा बनला आहे. मिरवणुकीची शतकोत्तर परंपरा आजही अबाधित ठेवली. विसर्जन मिरवणुकीसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. दरम्यान, जिल्ह्यात अकोला - पातूर मार्गावर गणेश भक्तांवर काळाने घाला घातला. गणेश विसर्जन करून परत येणाऱ्या भक्तांच्या वाहनाचा अपघात झाला आहे.

शहरातील शिवसेना वसाहत भागातील रहिवासी गणपती विसर्जनासाठी कापशी येथे गेले होते. जय बजरंग गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचे कापशी तलावावर मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन करून परत येत असताना दुचाकीचा अपघात झाला. मृत पावलेला तरुण आणि जखमी तरुण, असे चौघे जण एकाच दुचाकीवरून प्रवास करीत होते. त्यावेळी भरधाव दुचाकीला मोटारीने जबर धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला. मोटारीचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघातामध्ये रामचरण अंधारे यांचा मृत्यू झाला असून राहुल खोंड, विनोद डांगे, विक्की माळी हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघातातील गंभीर जखमी तरुणांवर उपचार केले जात आहेत.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन पंचनामा केला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## गोंदिया विमानतळावरून इंदूरनंतर दिल्ली विमानसेवा लवकरच

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ७ :

तालुक्यातील बिरसी येथील विमानतळावरून सध्या इंडिगोची गोंदिया-हैद्राबाद-तिरुपती ही विमानसेवा सुरू आहे. यानंतर १६ सप्टेंबर २०२५ पासून गोंदिया-इंदूर-बेंगळुरू या मार्गावर प्रवासी विमानसेवेला प्रारंभ होणार आहे. तर गोंदिया-दिल्ली प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी बालाघाटचे खासदार भारती पारधी यांच्या मागणी पत्रा नंतर केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांनी अनुकूलता दर्शविली आहे.

त्यामुळे या मार्गावर ही लवकरच गोंदियाहून प्रवासी विमान सेवेला प्रारंभ होणार असून ही निश्चित गोंदिया आणि शेजारील मध्यप्रदेश च्या बालाघाट जिल्हावासीयांसाठी ही दिलासा दायक बाब आहे. गोंदिया तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ तत्कालीन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने उभारण्यात आले. यानंतर सन २०२२ मध्ये फ्लाय बिग या कंपनीने गोंदिया-इंदूर या प्रवासी विमान वाहतूक सेवेला सुरुवात केली होती.त्यावेळी प्रवाशांचा सुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला होता. पण काही तांत्रिक अडचणीमुळे ही सेवा वर्षभराच्या आतच बंद झाली. यानंतर गेल्या वर्षीपासून इंडिगो विमान कंपनीने बिरसी विमानतळावरून गोंदिया-हैद्राबाद-तिरुपती या मार्गावर विमानसेवा सुरू केली.

## ओयोमधील जुगारावर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

मनीषनगर परिसरातील एका ओयो हॉटेलमध्ये सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी धाड टाकली. यावेळी ४ आरोपी ताश पत्त्यांवर हारजीतचा जुगार खेळताना सापडले. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेत त्यांच्याकडून ३० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. मॅथ्यू वर्गिस फिलोपस (५६) रा. गगन सिटी, पिपळा फाटा, विजय भगवान नारदेलवार (५०) रा. काचोरे लेआऊट, मनीषनगर, नितीन धीरजलाल राठोड (४६) रा. जीवन अक्षय सोसायटी, मनीषनगर आणि चैतन्य प्रमोद आवळे (३५) रा. प्रभूनगर, बेलतरोडी अशी अटकेतील जुगाऱ्यांची नावे आहेत.

मनीषनगरातील हॉटेल ब्रिंदावन ओयो येथे काही जुगारी जमले असून एका खोलीत जुगाराचा डाव भरला असल्याची माहिती बेलतरोडी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रात्री ८ वाजताच्या सुमारास हॉटेलवर धाड टाकली. झडतीदरम्यान हॉटेलच्या खोली क्र. १०३ मध्ये वरील आरोपी जुगार खेळताना आढळले.

पोलिसांनी चौघांनाही ताब्यात घेत डावावर लावलेले १८ हजार रोख, ४ मोबाईल फोन, २ दुचाकी आणि २ चारचाकी वाहन असा एकूण ३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगारबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# पुण्यातील विसर्जन मिरवणुकीला गालबोट

## अलका चौकात दोन गटात तुफान हाणामारी

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ७ :

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' म्हणत महाराष्ट्रात लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला. पुण्यातील विसर्जन मिरवणुका नेहमीच जगभरात प्रसिद्ध असतात. यंदाही परदेशातून अनेक भाविक ही भव्य मिरवणूक पाहण्यासाठी पुण्यात दाखल झाले होते. मात्र, याच विसर्जन मिरवणुकीदरम्यान एका अप्रिय घटनेमुळे मिरवणुकीला गालबोट लागले आहे. पुण्याच्या सर्वात गर्दीच्या ठिकाणांपैकी एक असलेल्या अलका चौकात दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

लक्ष्मी रोड, बाजीराव रोड आणि टिळक रोड परिसरात गणपती विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी प्रचंड गर्दी जमली होती. याच गर्दीतुन पुढे जाण्याच्या प्रयत्नात दोन गटांमध्ये वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली आणि त्यानंतर त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार पोलिसांच्या समोरच घडला. शिवमुद्रा वाद्यपथक वादन करत असताना ही घटना घडली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. एका पोलीस अधिकाऱ्याने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मध्यस्थी केली, त्यानंतर हा वाद थांबला.

दरम्यान, देशातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती दुपारी ३ वाजता अलका टॉकीज चौकात दाखल झाला.. भाऊसाहेब रंगारी गणपतीच्या विसर्जन मिरवणूक पारंपारिक रथातून काढण्यात आली. अलका टॉकीज चौकातून भंडाऱ्याची उधळण आणि अतिशबाजी करत श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीला निरोप देण्यात आला. तर ३ वाजून ५१ मिनिटांनी रंगारी गणपतीचे विसर्जन पार पडले.

## हाय टेन्शन वायरच्या शॉकने एकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

राज्यभरात गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना, मुंबईच्या साकीनाका परिसरात एका दुर्दैवी घटनेमुळे या उत्सवाला गालबोट लागले आहे. एका विसर्जन मिरवणूकी दरम्यान हाय टेन्शन वायरचा शॉक लागून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, चार जण गंभीर जखमी झाले आहेत. साकीनाका येथील खैराणी रोड परिसरात श्री गजानन मित्र मंडळाची विसर्जन मिरवणूक सुरू असताना हा अपघात घडला. मिरवणुकीतील ट्रॉलीला टाटा पॉवर कंपनीच्या ११ हजार व्होल्टेजच्या हाय टेन्शन वायरचा स्पर्श झाला. या वायर मधील एक छोटी वायर खाली लटकत होती. यामुळे ट्रॉलीवर असलेल्या पाच जणांना विजेचा जोरदार धक्का बसला. गंभीर जखमी झालेल्या पाचही जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी बिनू शिवकुमार (वय ३६) या तरुणाचा मृत्यू झाला. तर, तुषार गुप्ता (१८), धर्मराज गुप्ता (४४), आरुष गुप्ता (१२), शंभू कामी (२०) आणि करण कानोजिया (१४) यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# मला मंत्रिपद, कार्यकर्त्यांना काहीच नाही



■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. ७ :

राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) सक्रिय असून, महायुतीतील घटक पक्ष म्हणून भूमिका बजावत आहे. माज्यावर मंत्रिपदाची जबाबदारी असून केंद्रात मला मंत्रिपद देण्यात आल्याने कार्यकर्ते खुश आहेत. मात्र, केंद्रात व राज्यात महायुतीची सत्ता असताना देखील आमच्या कार्यकर्त्यांना महायुतीमध्ये काहीच मिळत नाही, अशी मनस्वी खंत केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी येथे बोलून दाखविली.नजीकच्या काळात किमान दोन महामंडळांचे अध्यक्षपद रिपब्लिकन पक्षाला मिळाले पाहिजेत, अशी अपेक्षाही केंद्रीय सामाजिक न्याय व सशक्तीकरण राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

केंद्रीय राज्यमंत्री आठवले रविवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. बुलढाणा येथील शासकीय विश्रामगृहात समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा त्यांनी आढावा घेतला. विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. लोकशाहीर अन्ना भाऊ साठे यांच्या जंयती उत्सवानिमित्त शेगाव येथे आयोजित कार्यक्रमानिमित्त केंद्रीय राज्यमंत्री आठवले बुलढाणा जिल्ह्यात आले होते. कार्यक्रमानंतर बुलढाणा शहरातील शासकीय विश्रामगृहात रामदास आठवले यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी, पत्रकारांच्या प्रश्नांवर उत्तर देताना राज्यमंत्री आठवले म्हणाले, माज्या मंत्रिपदावर कार्यकर्ते खुश आहेत, पण कार्यकर्त्यांना देखील संधी मिळाली पाहिजेत. त्या अनुषंगाने आगामी निवडणुकीनंतर आरपीआयला दोन तरी महामंडळे मिळावी, अशी चर्चा मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत केली आहे.

इतकेच नाही तर, राज्याच्या मंत्रिमंडळात एक मंत्रिपद रिक्त असून आमच्यासाठीचे ते ठेवलेले असावे, अर्थात ते आम्हाला मिळावे, अशी मागणीही रामदास आठवले यांनी केली. पत्रकार परिषदेत बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड, रिपाईंचे (आठवले गट) राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम, विदर्भ संपर्कप्रमुख बाबासाहेब जाधव आदी उपस्थित होते.

### नागपुरात गणेश विसर्जनाला उत्स्फूर्त प्रतिसाद
## ४१९ कृत्रिम तलावांमध्ये बाप्पाला निरोप



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ७ :

नागपूर महानगरपालिकेने शहरातील २१६ ठिकाणी तयार केलेल्या ४१९ कृत्रिम तलावांमध्ये गणेश विसर्जन पार पडले. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल आणि मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण व्यवस्था करण्यात आली होती.

शनिवारी सकाळपासून सुरू झालेले विसर्जन रात्री उशिरापर्यंत चालू होते. नैसर्गिक जलस्त्रोताऐवजी कृत्रिम तलावांमध्ये मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. मोठ्या मूर्तींसाठी गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी आणि लकडगंज भागातील कच्छीविसा परिसरात विशेष कृत्रिम तलाव तयार करण्यात आले होते. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी आणि दहा झोनचे सहाय्यक आयुक्त सर्व विसर्जन कुंडांवर उपस्थित होते. निर्माल्य विसर्जनासाठी स्वतंत्र कलश ठेवण्यात आले होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठ्या मूर्तींचे विसर्जन क्रेनच्या सहाय्याने करण्यात आले.

## नागपूरच्या अमित काशीकर यांनी नेदरलँड्समध्ये साजरा केला गणेशोत्सव



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

मराठी माणूस आता जगभरात पसरला आहे. जिथे तो गेला आहे त्याने आपली संस्कृती तिथे नेली आहे, ती पुरेपूर रुजवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातले सणसमारंभ आता महाराष्ट्रापुरता किंवा भारतापुरता न राहता त्याला जागतिक स्वरुप मिळाले आहे. नुकताच पार पडलेला गणेशोत्सव आता विविध देशात साजरा झाला. काही देशात तो नेहमीप्रमाणे दणक्यात साजरा झाला. मात्र नेदरलँड्समध्ये हा गणेशोत्सव पहिल्यांदाच साजरा झाला. या यशस्वी आयोजनामागे मूळ नागपूरकर असलेल्या अमित काशीकर यांचा सिंहाचा वाटा होता. अमित काशीकर यांचे शिक्षण नागपुरात झाले असून काही काळ भारतात राहिल्यानंतर कामानिमित्त त्यांचे विविध देशात वास्तव्य होते.

गेल्या १२ वर्षांपासून ते नेदरलँड्सला आहेत. तिथे फक्त मराठीच नाही तर तमाम भारतीयांना एकत्र आणून त्यांनी विज द पिपल नावाची संस्था यावर्षी गुढीपाडव्याला स्थापन केली. नेदरलँड्समध्ये राहत असलेल्या भारतीयांना एकत्रित आणण्यापासून ते अडचणी सोडवण्यापर्यंत अनेक कामात ही संस्था सक्रिय सहभाग घेते. या संस्थेतर्फे ३० ऑगस्टला गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ३०० पेक्षा अधिक लोक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी थेट जर्मनीहून ढोल पथक बोलवण्यात आले होते. उपस्थितांनी एकसुरात आरती म्हणत वातावरणात भक्तिरसाची निर्मिती केली. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमही पार पडले. यावेळी संस्थेतर्फे एआय सोबत निगडीत उपक्रमाचे अनावरण करण्यात आले. तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर वादविवाद स्पर्धाही घेण्यात आली.

# ओबीसी हक्कासाठी न्यायालय आणि रस्त्यावर देणार लढा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या शासन निर्णयात पात्र असा शब्द वापरला होता. नंतर दुसरा शासन निर्णय काढून हा शब्द वगळण्यात आला. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. हा मूळ ओबीसी समाजावर अन्याय आहे. याविरोधात लढा देण्यासाठी २५ प्रमुख लोकांची एक समिती गठीत करून ऑक्टोबरमध्ये नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार, अशी माहिती ओबीसी नेते तथा काँग्रेसचे विधानसभेतील पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.

नागपुरातील रवी भवन येथे शनिवारी विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील ओबीसी संघटनांची बैठक झाली. या बैठकीत मार्गदर्शन करीत असताना वडेट्टीवार बोलत होते. व्यासपीठावर आमदार अभिजित वंजारी, माजी खासदार खुशाल बोपचे, ओबीसी नेते शेखर सावरबांधे, ओबीसी अभ्यासक नागेश चौधरी, ओबीसी नेते ईश्वर बाळबुधे, ओबीसी नेते ज्ञानेश वाकुडकर, अ‍ॅड. किशोर लांबट, ओबीसी युवा अधिकार मंचचे उमेश कोर्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. तीन तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत संघटनांच्या नेत्यांनी मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासंदर्भात स्पष्ट विरोध दर्शविला.

### नागपुरात महामोर्चा काढणार : वडेट्टीवारांचा इशारा

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयातून ओबीसींचे नक्कीच नुकसान होणार आहे. २७ टक्के आरक्षणातून १३ टक्के आधीच वजा होते. उरलेल्या १९ टक्क्यांतही मराठा समाजाला आरक्षण दिल्यास ओबीसींना किती उरणार? ओबीसींचा हक्कच संपण्याची शक्यता आहे. कुणी कुठल्याही पक्षाचा असला तरी आपल्यासाठी झटणाऱ्याला साथ द्या, असे आवाहनही वडेट्टीवार यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आरक्षणाला विरोध आहे. त्यांच्या विचारसणीचे लोक सत्तेत आहेत. त्यांच्याकडून आपण ओबीसी आरक्षणाला धक्का न लागू देण्याची अपेक्षा कशी करू शकतो? आज आपण न्यायालयीन लढाई न लढल्यास ओबीसींना मोठा धक्का बसणार आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण संपविण्याचा त्यांचा डाव असल्याचा धोकाही वडेट्टीवार यांनी वर्तविला. नागपुरात येत्या १२ सप्टेंबरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भात जाहीर शासन निर्णयावरील लढाईच्या अनुषंगाने व्यूहरचना निश्चित होईल. मात्र दोन स्तरावर लढाई लढण्याचे शनिवारच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. पहिली लढाई न्यायालयीन स्तरावर लढली जाणार आहे.